
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

# हाकारा

एप्रिल - जून २००८



# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
## कार्यकारी मंडळ
२००७ - २०१०

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष व संस्थापक | : | प्रा. रा. के. मुटाटकर |
| उपाध्यक्ष | : | डॉ. हेमंत आपटे |
| कोषाध्यक्ष | : | ग. शां. पंडित |
| सचिव | : | डॉ. अभय कुदळे |
| सहसचिव | : | सज्जु जोसेफ |
| सदस्य | : | डॉ. रजनीकांत आरोळे |
| | | डॉ. चंद्रकांत पांडव |
| | | डॉ. सुभाष वाळींबे |
| | | डॉ. राम गंभीर |
| | | जयवंत मंत्री |
| | | डॉ. बाबुल पठाण |
| | | डॉ. कल्पना मुटाटकर |
| | | विदुला पुरोहित |

*कष्टकरी जनता, भूषण भारता । वंदन करितो पददलिता ।।*

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

संपादक
रामचंद्र मुटाटकर

# हाकारा (त्रैमासिक)

कार्यकारी संपादक
ग. शां. पंडित

वर्ष : २९ वे | एप्रिल-जून २००८ | अंक : दुसरा

## अनुक्रमणिका


१. **आदिवासी विकास व स्वयंसेवी संस्था** - प्रा. सुनील पं. उगले, डॉ. डी. आर. बच्छाव ३

२. **नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विकासात बाएफ मित्र या स्वयंसेवी संस्थेचे योगदान** - प्रा. सुनील पं. उगले, डॉ. डी. आर. बच्छाव ११

३. **आदिवासी लोक जीवन व प्रकृतीतून निर्माण झालेला इतिहास** - विरसिंग पाडवी २२

४. आदिवासी एकता मानवी मूल्याची खाण - वाहरु सोनवणे २४

५. **आदिवासी समुदायासाठी समुदाय रेडिओची उपयुक्तता** - श्री. विनायक दिनकर पाटील २५

६. क्रांतीकारी गोदावरी परुळेकरांची आदिवासी चळवळ...... - प्रा. डॉ. महेश मोट २९

७. **आदिलाबादमधील आदिवासी भागामध्ये अतिसार एक मानवशास्त्रीय अवलोकन** - प्रशांत कुलकर्णी, विरेंद्र परदेशी ३६

८. **मराठी आदिवासी कवितेतील स्त्री** - सौ. उल्का समरेंद्र निंबाळकर ४०



• **पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.
टेलिफॅक्स (०२०)२५८९७२९८

• **अक्षर जुळणी**
नंदू हि. दिघे

अंक मूल्य ४०/- रूपये

• **मुद्रक व प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
अध्यक्ष, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

• **मुद्रण स्थळ**
ओम इंटरप्राईजेस, पुणे



या अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

या अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने अनुदान दिले असले तरी अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय

स्वातंत्र्यानंतर शासनाने जनतेच्या कल्याणासाठी विविध समाज विकास योजना तयार केल्या; परंतु त्यातून विकास काही साधला गेला नाही. कारण त्या सर्व योजना लोकाभिमुख नव्हत्या. त्यात लोकसहभाग नव्हता. त्यामुळेच लोकांच्या गरजा ओळखून त्याअनुषंगाने छोटे-मोठे समाज गट एकत्र करुन त्यांमध्ये विविध प्रकल्पांच्या माध्यमातून काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचा उदय झाला. या संस्थांचे कार्यकर्ते प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात लोकांमध्ये राहून काम करु लागल्याने लोकांच्या नेमक्या गरजा काय आहेत हे त्यांना समजले व लोकांचा विश्वासही त्यांनी संपादन केला. आज बायफ, आयआयई, केईएम, एफआरसीएच, मासूम, मास, ग्रामीण आरोग्य प्रकल्प इत्यादी स्वयंसेवी संस्था नावारुपाला आलेल्या आहेत.

स्वयंसेवी संस्थांच्या कामाची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेण्यात आली. त्यामुळे शासनाला देखील लोकांमध्ये विविध विकासाचे कार्यक्रम राबविताना स्वयंसेवी संस्थांचा सहभाग महत्त्वाचा वाटू लागला. बायफ चा वाडी प्रकल्प, भारतीय शिक्षण संस्थेचा निरंतर व अनौपचारिक शिक्षणाचा प्रकल्प, मास व सीआरएचपी यांचा संयुक्त आदिवासी उत्थान कार्यक्रम इत्यादी कार्यक्रम आज शासन व स्वयंसेवी संस्थांच्या सहभागाने चालू आहेत व त्याचे चांगले परिणामही दिसू लागले आहेत.

सदरच्या अंकात बायफ च्या आदिवासी विकासाच्या संदर्भातील कार्याची माहिती देण्यात आली आहे. त्याचबरोबर आदिवासी क्षेत्रात कार्य करताना कोणते तंत्रज्ञान उपयोग पडू शकले, याची देखील माहिती देण्यात आली आहे. गोदावरीताई परुळेकरांच्या संघटनात्मक चळवळीच्या कार्याची ओळख देखील या अंकातून होते.

एकंदरीत स्वयंसेवी संस्था-संघटनांचे आदिवासी विकासाच्या क्षेत्रातील योगदान कसे असू शकते याचा अल्पसा परिचय या अंकातून आपल्याला होईल. त्यासंबंधीच्या आपल्या बहुमोल प्रतिक्रियांचे स्वागतच आहे.

संपादक मंडळ

# आदिवासी विकास व स्वयंसेवी संस्था

प्रा. सुनील पं. उगले
डॉ. डी. आर. बच्छाव

भारताला स्वातंत्र्य मिळून आता ६२ वर्षे झालीत. मात्र या बासष्ठ वर्षात आदिवासींचा किती विकास झाला व त्यांच्या पुढे कोणते प्रश्न उभे राहिले याचे सिंहावलोकन करण्याची गरज आहे. कारण आजही कित्येक आदिवासी समाजातील लोकांना देशाचे नाव सांगता येत नाही. देशाचा राष्ट्रपती कोण माहीत नाही. स्वातंत्र्यानंतर आदिवासींची अशी पिढी शिक्षण घेत आहे की, ज्यांच्या कित्येक पिढ्यांना कागद, पुस्तक, पाटी नावाची वस्तू याचा स्पर्श झालेला नव्हता. त्या पिढीला पुढे आणायचे व त्यांचेकडून आदिवासी संस्कृतीची ओळख देशाला करून देण्यासाठी स्वयंसेवी संस्थांच्या मदतीची गरज आहे. कारण स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताची सर्वांगीण प्रगतीची घोडदौड सुरु आहे. जागतिकीकरणात यश संपादन करण्यात भारताने पुढाकार घेतला आहे हे सत्य असले तरी अजून बरीच प्रगती साध्य करावयाची आहे. वाढती लोकसंख्या व भारताचा विस्तार लक्षात घेता केवळ एकटे सरकार सर्व योजना राबवू शकणार नाही म्हणून आदिवासी व ग्रामीण विकासाकरीता सरकारच्या मदतीला स्वयंसेवी संस्थांच्या मदतीची आवश्यकता आहे.

ढोबळ मानाने असे म्हटले जाते की, स्वयंसेवी संस्था ज्या स्वयंप्रेरणेने एकत्र येऊन समाज विकासासाठी विविध उपक्रम हाती घेत असतात. अशा एकत्र आलेल्या व्यक्तींच्या समूहाला कायद्याचे अधिष्ठान असते. समान हेतुने एकत्र येऊन लोकांचे प्रश्न सोडविण्यास ते प्रयत्नशील असतात. अशा संस्था सामाजिक बांधिलकीने, सेवाभावी वृत्तीने उपेक्षित समाजाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि वैद्यकीय प्रगतीकरिता, सर्वांगीण विकासाकरिता, देणगीदारांच्या आणि शासकीय, निमशासकिय किंवा खाजगी आर्थिक मदतीवर अवलंबून असतात. त्या निधीची, अनुदानाचा संस्थेच्या ध्येय व उद्देशानुसार विशिष्ट सामाजिक कार्याकरीता विनियोग करतात. समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी झगडतात. मात्र केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या विविध अधिनियमांखाली किंवा कायद्याखाली नोंदणीकृत असतात, अशा कायदेशीर मान्यता असलेल्या संस्थेला स्वयंसेवी संस्था किंवा बिगर शासकीय संस्था (Non Government Organization - NGO) असे म्हटले जाते.

दीर्घकाल भारतीय आदिवासी आपले परंपरागत जीवन अगदी सुखासमाधानाने जरी जगत नसला तरी आज प्रत्यक्षात स्वातंत्र्योत्तर काळात त्यांच्या जीवनात कितपत कल्याणकारी बदल झालाय ? याचे उत्तर अत्यंत निराशावादी आहे. आदिवासींच्या परिवर्तनाबाबत साधारणत: तीन दृष्टिकोनाचा विचार केला जातो. एक म्हणजे त्यांना पूर्णपणे अलिप्त ठेवून

त्यांचेशी संपर्क न ठेवता त्यांना त्यांचे जीवन स्वायत्तपणे जगू द्यावे. दुसरा विचार असे सुचवतो की, त्यांना पूर्णपणे प्रगतीत सामील करून घ्यावे. प्रगत समाजाची संस्कृती व सामाजिक जीवन त्यांनी स्वीकारावे. पण या दृष्टिकोनांचा अगदी टोकाचे व अत्यंत समस्याजनक म्हणून स्वीकार करता येत नाही. तेव्हा यातील सुवर्णमध्य साधणाऱ्या दृष्टिकोनाचा म्हणजे आदिवासी जीवनातील चांगल्या बाबी ठेवून त्यांच्या जीवन विषयक दृष्टिकोनाची कदर करून त्यांना राष्ट्रीय प्रवाहात सामील करून घेतले पाहिजे. कितीही प्रयत्न केला जरी आदिवासी सुधारणार नाही, अशी प्रतिक्रिया तथाकथित स्वयंमान्य सुधारलेल्या लोकांत आढळून येते. तुम्ही त्यांना राष्ट्रीय प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करा, ते दूर पळतात असे बुद्धीवादी, अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ यांना म्हणजेच तथाकथित मुख्य प्रवाहाबद्दल चिंता करणाऱ्यांना वाटते. शासनाच्या विकास योजनांद्वारे आदिवासींना राष्ट्रीय प्रवाहात आणण्याचे प्रयोग चालू आहेत. आदिवासी विकास योजना हा त्याचाच एक भाग आहे. आदिवासी विकासासाठी उद्योग पुरविण्याच्या नावाखाली धरणे, रस्ते, विद्युत केंद्रे निर्माण करून करोडो रूपयांचा खर्च सरकार दाखवू शकते, परंतु अजून त्यांना लंगोटीयुगापासून बाहेर आणण्यात सरकार यशस्वी झाले, असे म्हणता येणार नाही. कारण मुख्य प्रवाहापासून आदिवासी अजून फार मागे आहेत.

बहुजन समाजाचा विचार आदिवासींनी करण्यापेक्षा बहुजन समाजाने आदिवासींचा विचार करणे योग्य ठरणार आहे. आदिवासी समाजासाठी घटनेत तरतुदी आहेत. परंतु या समाजाचे शोषणापासून संरक्षण करण्याची जबाबदारी राज्य सरकारची असताना शोषण तर थांबले नाहीच, उलट शोषणाचा वेग वाढला. आदिवासींचे मूलभूत मानवी हक्क पदोपदी तुडवले गेले. त्यांचे परंपरागत वहिवाट हक्क नाकारून त्यांना उपरे, अतिक्रमण करणारे ठरवले जात आहे. त्यांच्या जगण्याच्या साधनांपासून त्यांना वंचित केले जात आहे. त्यांची जीवनपध्दती, संस्कृती नष्ट केली जात आहे. आणि हे सर्व लोकशाहीच्या नावाखाली होत आहे. जागतिक पातळीवर सरकारतर्फे आदिवासींचे अस्तित्व नाकारले जात असता आदिवासी आपल्या अस्तित्वाच्या संघर्षात अडकला आहे. तरी सुध्दा मानवतावादी मुक्तीलढ्यापासून त्याला अलिप्त राहता येणार नाही. परंतु त्यासाठी शोषण, जुलूम, दारिद्रय व दडपशाही याविरुध्द ठामपणे उभे राहण्यासाठी वैचारिक जागृती व मानसिक धैर्य बाळगण्याची आणि मानसिक गुलामगिरी टिकवणाऱ्या विचारसरणीपासून फारकत घेण्याची तयारी ठेवणे आवश्यक आहे. पिढ्यानपिढ्या शोषित, वंचित, उपेक्षित आदिवासी समाज आता कुठे बुध्दीभेद, दिशाभूल ओळखू लागला आहे. ज्याला बहुजन समाज म्हणता येईल असा चातुर्वर्ण्याच्या चौकटीतील विषमतेची सवय झालेला समाज समतेचा विचार करू लागला तर आधुनिक युगात ती फार मोठी घटना ठरणार आहे.

केवळ शासकीय घोषणांवर व सत्ताधाऱ्यांच्या मेहेरबानीवर आदिवासींचा भविष्यात विकास होईल असे म्हणून चालणार नाही. शासनाच्या मदतीला स्वयंसेवी संस्थांच्या मदतीचीही तितकी च आवश्यकता आहे. संपूर्ण आदिवासी समाज ताणतणावाच्या, दहशतीच्या आणि स्पर्धेच्या

अंमलाखाली जीवन जगत आहे. समस्यांचे बदलते स्वरूप मानवी मूल्यांना विसरुन गेले आहे. मानवनिर्मित आपत्तींचे स्वरूप उग्र होत असून माणसामाणसातील दरी रुंदावत चालली आहे. त्यामुळेच जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर स्वयंसेवी संस्थांची समाज परिवर्तनात भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. जागतिकीकरणाच्या झपाट्यात आदिवासी समाजाचे प्रश्न बदलत आहे. ताणतणावाच्या आणि स्पर्धेच्या अंमलाखाली समाज वावरत आहे. अशामध्ये एखादी घटना घडते. समाजातील काही व्यक्ती समाज चांगला राहावा, सामाजिक स्वास्थ जपले जावे, सर्वांचे कल्याण व्हावे व समाजाला सुरक्षा मिळावी अशा ध्येयाने प्रेरीत होतात. आपापल्यापरीने सामाजिक बांधिलकी समजून समाज ऋणातून मुक्त होण्यासाठी काहीतरी सामाजिक काम करतात. त्यातून काही मंडळे, प्रतिष्ठाने, क्लब तयार होतात. काही लोक या कामात टिकून राहतात तर काही पुन्हा फिरकत नाहीत. समविचारी लोक एकत्र येतात. समाज सुधारण्याचा विचार करतात. काय करायचे हे निश्चित नसते; पण दु:खितांबद्दल, दुर्लक्षितांबद्दल त्यांना कनवळा असतो. अशा व्यक्ती प्रसंगानुसार कार्यक्रम घेतात. खरेतर अशी मंडळी निरपेक्ष हेतूने काम करतात. समाजसेवा, समाजकार्ये, समाजकल्याण ह्या संकल्पनाही त्यांना माहीत नसतात. तरीही एकत्र काम करून जनसंपर्कात राहून लोकांच्या अडचणी लक्षात घेऊन त्या समस्यांचे काही प्रमाणात निराकरण करून आपली एखादी संस्था असावी या विचारातून स्वयंसेवी संस्थेची निर्मिती होते. लोकविकासाची बांधिलकी मानून विकासात्मक उपक्रमात लोकांचा सहभाग वाढविला जातो.

वास्तविक पाहता भारतात स्वयंसेवीवृत्तीने काम करण्याला फार जुनी परंपरा आहे. ब्राम्हो समाज, आर्य समाज, रामकृष्ण मिशन यांसारख्या चळवळी १९ व्या शतकात झाल्या. त्यानंतर महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस, वल्लभभाई पटेल, जवाहरलाल नेहरू, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, लाल लजपत राय यांनी सामूहिक कृत्तीतून सुधारणात्मक चळवळी केल्या. स्वातंत्र्यानंतरच्या काळात म्हणजे पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या दरम्यान समाज कल्याणासाठी चार कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली, तेव्हा या अनुदानाचा वापर कसा करावयाचा हा प्रश्न नियोजनकर्त्यांना देखील पडला. अनुदानाचा विनियोग हा सरकारी यंत्रणा करेल की, स्वयंसेवीवृत्तीने काम करणाऱ्या संस्था करतील यावर विचार झाला. त्यावेळी तर समाजकल्याण विभाग या राज्यातही नव्हता आणि केंद्रातही नव्हता. त्यावेळी पंडित जवाहरलाल नेहरुंच्या नेतृत्वाखाली असे ठरले की, समाजकल्याणासाठी स्वतंत्र यंत्रणा असावी, की जी लवचिक, सामाजिक बांधिलकी मानणारी असेल.यावेळी असे वाटू लागले की, समाजकल्याण कार्यक्रम सरकारी यंत्रणेकडे न सोपवता पारंपरिक पध्दतीने व समर्पित भावनेने काम करणाऱ्या स्वयंसेवी पध्दतीची यंत्रणा निर्माण व्हावी. यानुसार १९५३ ला केंद्रीय समाजकल्याण मंडळाची (Central Social Welfare Board) स्थापना झाली. त्याच्या पहिल्या अध्यक्षा डॉ. दुर्गाबाई देशमुख होत्या. या बोर्डाने १९५३ ला ३,००० स्वयंसेवी संस्थाना अनुदान दिले. तर १९६१-६२ या वर्षात सुमारे ६,००० स्वयंसेवी संस्थांना आर्थिक मदत केली. यावरुन भारतात स्वयंसेवी संस्थांची चळवळ फार जुनी आहे हे दिसून

येते. म्हणूनच या संस्था आदिवासी व ग्रामीण विकासात मोलाचे योगदान देऊ शकतात.

निदान डोक्यावर छप्पर असावे, पोटभर काही तरी खायला मिळेल अशा रोजगार असावा पण स्वातंत्र्याला साठ वर्षे लोटली तरी त्यांचे शोषण चालूच आहे. त्यांच्या अज्ञानाचा, अनाथपणाचा म्हणजे त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय मागणाऱ्या सक्षम शक्तीच्या अभावाचा फायदा कायद्याचे रक्षकच घेत आहेत. डोंगरदऱ्यात, रस्त्याच्या कडेला, झोपडपट्ट्यांत, गावाबाहेर, रेल्वे स्टेशन इत्यादी ठिकाणी अद्यापि रहावे लागणाऱ्यांचे घोषवाक्य ''स्वातंत्र्याचं जालं काय, आमच्यापातुर आलं नायं'' असे बनलं आहे. एकूण आदिवासींच्या परिवर्तनाची व्याप्ती अद्यापि फारच मर्यादित राहिली आहे. त्याबाबत शासन, राजकीय पक्ष, सामाजिक कार्यकर्ते, समाजसेवक व स्वयंसेवी संस्था पावले उचलत असले तरी हे प्रयत्न अपुरे आहेत. ते अधिक झाले पाहिजेत. आजमितीस महाराष्ट्रात अनेक स्वयंसेवी संस्था कार्यरत असून अगदी पुरातन काळापासून ग्रामीण व आदिवासी विकासात त्या आपले योगदान देत आहेत. स्वयंसेवी संस्था ही स्वायत्त संस्था असून असहाय्य, दुःखी गरीब लोकांना स्वावलंबी बनविणे हे तिचे मुख्य ध्येय असते. या स्वयंसेवी संस्था आर्थिक फायद्यासाठी काम करत नाही. ग्रामीण व आदिवासी विकास कार्यक्रमात सरकारच्या मदतीला अशा संस्थांचा सहभाग अत्यंत आवश्यक आहे, त्याची अनेक कारणे देता येतील.

१. आदिवासी जनतेपर्यंत विकासाची गंगा पोहचत नाही त्यांना संघटीत करण्याचे काम स्वयंसेवी संस्था चांगल्या प्रकारे करू शकतात.

२. सेवाभावी संस्थांना ग्रामीण व आदिवासी विकासात स्थानिक लोकांचा सहभाग सहज प्राप्त करून घेता येतो. त्यामुळे योजना सहज अशा जनतेपर्यंत पोहोचतात.

३. सरकारच्या अनेक कार्यक्रमात जनतेचा सहभाग अत्यंत आवश्यक असतो. उदा. कुटुंब नियोजन सहभाग अशा बिगर सरकारी संस्था वाढवू शकतात.

४. स्वयंसेवी संस्थांचा दृष्टीकोन सेवाभावी व मानवतावादी असल्यामुळे जनसंपर्क वाढवून योजनांची परिणामकारक अंमलबजावणी होण्यास मदत होते.

५. बिगर सरकारी संस्था स्थानिक गरजा, उपलब्ध साधनसामग्री, गरजांची प्राधान्यता यांचा चांगल्या प्रकारे विचार करू शकतात.

६. लोकांमध्ये आत्मनिर्भरता आणणे, साधनसामग्री गोळा करणे ही कामे बिगर सरकारी संस्था चांगल्या प्रकारे करतात.

७. ग्रामीण व आदिवासी भागात विविध प्रकारच्या समस्या आहेत. त्यामुळे अशा समस्या सोडविण्याचे कार्य एकट्या सरकारी यंत्रणेकडे सोपविण्याऐवजी विविध स्वयंसेवी संस्थांकडे सोपविणे योग्य ठरेल.

८. बिगर सरकारी संस्थांकडे आदिवासी व ग्रामीण भागात कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा गट असतो. यामुळे लक्ष गटाशी सहज जवळीकता साधता येते.

९. भारताचा विस्तार, विविध प्रकारच्या योजना, विविध समस्या या सर्वांचा विचार करता शासनावर अनेक मर्यादा येतात. त्यासाठी सरकारला अशा सेवाभावी संस्थांच्या मदतीची नितांत गरज आहे.

आज भारतात सुमारे दोन लाख स्वयंसेवी संस्था / बिगर सरकारी संस्था अस्तित्वात असून विविध क्षेत्रात त्या कार्य करताना दिसतात. भारताच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासात ग्रामीण व आदिवासी भागाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. शेती व ग्रामीण उद्योग यांच्या विकासातून केवळ आदिवासी व ग्रामीण भागाचाच नव्हे; तर संपूर्ण अर्थव्यवस्थेचा विकास होईल. परंतु हा विकास साध्य करण्यात केवळ सरकारचीच भूमिका महत्त्वाची नसून आदिवासी व ग्रामीण भागातील लोकांचा सक्रिय सहभाग, सहकार क्षेत्र व स्वयंसेवी संस्था यांचेही योगदान तितकेच महत्त्वाचे आहे. आदिवासी व ग्रामीण भागातील वाढते दारिद्रय, बेरोजगारी, आरोग्याचा प्रश्न, पिण्याचे पाणी, वाहातूक व्यवस्था, शिक्षण यासाठी सरकार मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत असूनही सरकारला मात्र अपेक्षित यश मिळताना दिसत नाही. आदिवासी व ग्रामीण भागात दारिद्रय रेषेखाली जीवन कठणाऱ्या लोकांचे प्रमाण जास्त आहे. विशेषत: अतिदुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासींचे प्रमाण त्यात जास्त आहे. या सर्वांसाठी विविध सुविधा पुरविण्यासाठी सरकारला अवाढव्य खर्च करावा लागतो. सरकारवरील या कामाची जबाबदारी काही प्रमाणात कमी करणे सहज शक्य आहे. यासाठी सेवाभावी वृत्तीने, सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून काम करणाऱ्या संस्था सरकारला मदत करू शकतात. विकासाच्या दृष्टिकोनातून लोकांची मानसिकता तयार करण्याचे काम या स्वयंसेवी संस्था प्रभावीपणे करू शकतात.

महाराष्ट्रात सध्या कितीतरी संस्था हे कार्य करताना दिसतात त्यात अजून वाढ होणे आवश्यक आहे. कारण समाजाच्या सुदृढ वाढीसाठी अशा स्वयंसेवी संस्थांची नितांत गरज आहे. समाजाच्या एकंदर पटलावर त्याचं स्थान छोटे जरूर असतं पण महत्त्वाचं असतं. अशा स्वयंसेवी संस्था लोकांचा सहभाग वाढवतात, आशाआकांक्षा फुलवतात. समाजात जीवन जगण्याची नवी उमेद निर्माण करतात. कारण अनेक वेळा सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी लोक पुढे येत नाही. सरकारच्या योजनांची माहिती करून घेत नाही. विकासाबाबत उदासीन असतात त्यांची ही वृत्ती दूर करून समाजाला विकासाभिमुख बनवून स्वयंसेवी संस्था सरकारच्या कार्याला हातभार लावू शकतात. महाराष्ट्रात बाएफ मित्र सारख्या अनेक स्वयंसेवी संस्था असे कार्य करताना दिसतात. अनेक आदिवासी विकास योजना सरकारच्या कारभारामुळे लालफितीत अडकून पडतात. अशावेळी स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य लाखमोलाचे ठरते. आज केंद्रसरकार, राज्य सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था व विविध स्वयंसेवी संस्था आदिवासी व ग्रामीण भागात कार्य करताना दिसतात, परंतु या कामात जर दाहोमंध्ये समन्वय नसेल तर अनेकवेळा कामाची पुनरावृत्ती होते. एकाच कामावर दुहेरी पैसे खर्च होतात. त्याकरीता सरकार व स्वयंसेवी संस्था यांच्यात समन्वय हवा. ज्या क्षेत्रात स्वयंसेवी संस्था प्रभावी काम करत आहे त्या क्षेत्रात सरकारने फक्त लक्ष ठेवण्याचे कार्य करावे. वेळप्रसंगी सल्ला

किंवा मदत करावी. त्याचप्रमाणे ज्या क्षेत्रात सरकारचे उल्लेखनीय कार्य आहे अशा ठिकाणी स्वयंसेवी संस्थांनी सरकारचा सहाय्यक म्हणून भूमिका पार पाडावी. यामुळे साधनसामग्रीचा अपव्यय तर टळेलच शिवाय साधनसामग्रीचा पर्याप्त वापर होऊन शेवटच्या आदिवासींपर्यंत योजनांचा लाभ पोहोचेल.

स्वयंसेवी संस्था या त्यांच्या नावातूनच सूचित होणाऱ्या अर्थाने कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न बाळगता केवळ सेवाभावी हेतुने समाजासाठी कार्य करत असतात. वास्तविक बघता समाजाच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी शासनाची असते. मात्र शासनाच्या मर्यादा व वाढता व्याप विचारात घेता समाजाची मानसिकता तयार करणे, विकास कार्यात जनतेचा सहभाग वाढविणे, लाभार्थी निवडणे, साधनसामग्रीचा योग्य व कार्यक्षम वापर करणे या बाबत सरकार बारकाईने लक्ष देऊ शकत नाही. ज्या सेवा व सुविधा पुरविण्यासाठी वैयक्तिक लक्ष देण्याची गरज असते अशा सेवा व सुविधांच्या बाबतीत शासकीय यंत्रणेला एक उत्तम, कार्यक्षम व समर्थ पर्याय म्हणून स्वयंसेवी संस्था उभ्या राहात आहे. यासाठी आदिवासी व ग्रामीण विकासाच्या संदर्भात शासकीय यंत्रणेला पर्याय म्हणून स्वयंसेवी संस्थांची भूमिका बहुमोल मानली जाते.

**स्वयंसेवी संस्थांची भूमिका -**

१. लोकांना संघटीत करून त्यांचे प्रश्न त्यांनीच सोडविण्यासाठी लोकाना प्रवृत करणे.

२. सरकारी यंत्रणा आणि लोकसमूह व कार्यक्रम यांना जोडणारा दुवा म्हणून कार्य करणे.

३. लोकसहभागातून कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे.

४. स्वयंसेवी संस्था ही स्वायत्त संस्था असून असहाय, दु:खी, गरीब लोकांना स्वावलंबी बनविणे हे तिचे मुख्य ध्येय असते.

५. ग्रामीण व आदिवासी भागातील अपंग, मूक बधिर, अंध, वृध्द, विधवा, महिला, निराश्रित बालक यांना संरक्षण देणे.

६. विकास कार्याचा मुख्य हेतू आदिवासी व ग्रामिण लोकांना स्वावलंबी वा आत्मनिर्भर बनविणे.

७. शासनाने विविध विकास कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी या कामात लोकांचा सहभाग वाढविणे, स्थानिक नेतृत्व विकसित करणे.

८. विकास कार्यक्रम राबविणे अधिकारी व नोकवर्ग यांना स्थानिक साधनांची गरजांची आणि लक्ष्य गटांची ओळख करुन देणे.

९. शासनाच्या वतीने विविध योजना राबविल्या जातात. त्यांचा अभ्यास करणे, नियमावली व कार्यपध्दती लाभार्थींना समजावून सांगणे व फायदे मिळवून देणे.

१०. मूलभूत सेवा सुविधा पुरविणे.

स्वयंसेवी संस्था ह्या महिला सबलीकरण, अपंग, बालकामगार, अंधश्रध्दा निर्मूलन, ज्येष्ठ नागरीक, शिक्षण, बचत गट, एडस् जनजागृती, समाजभिमुख कायदे, पर्यावरण संरक्षण, स्वयंरोजगार, व्यक्तीमत्व विकास, ग्रामस्वच्छता अभियान, वृक्षरोपन या आणि अशा अनेक बाबतीत जनजागृतीचे काम करत असतात.

### स्वयंसेवी संस्थांची वैशिष्ट्ये

१. स्वयंस्फूर्तीने लोकांनी तयार केलेली व लोकसहभाग असलेली यंत्रणा असते.

२. संबंधीत कायद्याचे संस्थेला अधिष्ठान असते.

३. संस्थेच्या व्यवस्थापनासाठी कार्यकारी मंडळ असते.

४. स्वायत्तता असल्यामुळे उपक्रमात व नियोजनात बदल करता येतो.

५. मानवी विकासाची बांधिलकी असते.

६. लोकांच्या प्रश्नांची जाण असल्यामुळे सामाजिक व आर्थिक प्रश्न सोडविण्यास मदत करते.

७. कोणत्याही कार्यक्रमाचे स्वत: नियोजन करून अंमलबजावणी केली जाते.

८. स्वयंस्फूर्तीचे काम करणारे कार्यकर्ते असल्याने काही बाबतीत लवचिकता असते.

९. हिशोबाची व खर्चाची नोंद ठेवलेली असते.

१०. समाजातून फंड जमा करू शकते.

११. सेवाभावी संस्था ही स्वायत्त असते. तिच्यावर सरकारचे किंवा बाह्य शक्तींचे नियंत्रण नसते.

१२. सेवाभावी संस्था या अराजकिय संघटना असून त्या ना नफा ना तोटा तत्वावर चालतात.

### स्वयंसेवी संस्थांच्या संदर्भात

स्वयंसेवी संस्थांची नोंदणी, संस्थेची ध्येय व उद्देश, नियम व नियमावली, संस्थेचे नाव व कार्यालयाचा पत्ता, पदाधिकाऱ्यांची कार्य व त्यांची रचना, कार्यकारी मंडळांचे अधिकार, प्रकल्प प्रस्ताव संस्था हिशोब आणि अंकेक्षण, ८० जी प्रमाणपत्र, परदेशी मदत, संस्था कार्य, देखरेख व मूल्यमापन आदी बाबींवर संस्थांना विशेष लक्ष द्यावे लागते. विशेषत: आदिवासी व ग्रामीण सर्वसामान्य जनतेचा जीवनस्तर सुधारण्यासाठी बिगर सरकारी संस्था जास्त प्रभावी ठरू शकते. कारण अशा बिगर सरकारी संस्था धर्मादाय वृत्तीने, फक्त सेवा पुरविणे, सहभागी पध्दतीने किंवा उत्थानाच्या दृष्टीने कार्य करत असते. त्यांचे कार्यक्षेत्र वस्ती, आदिवासी विभाग, ग्रामीण विभाग, शहरी विभाग, राष्ट्रीय स्तर किंवा आंतराष्ट्रीय स्वरूपाचे असते. मात्र सेवाभावी संस्थांना विकास कार्ये, कल्याण कार्ये व समाजपरितर्वनाची कार्ये करताना विविध समस्यांना तोंड द्यावे लागते.

### स्वयंसेवी संस्थांच्या समस्या

१. सेवाभावी संस्थांजवळ पुरेसा निधी नसतो. जो निधी उपलब्ध होतो तो वेळेवर उपलब्ध होतोच असे नाही. त्याची शाश्वती देखील नसते.

२. आदिवासी व ग्रामीण कामे करण्यासाठी योग्य ते प्रशिक्षण असणाऱ्या कार्यकर्त्यांचा अभाव असतो.

३. अनेक संस्थेत निर्माण होणारी एक व्यक्तीची हुकुमशाही, सत्ता, कुटुंबशाही त्यामुळे एकाधिकार तत्त्वावर कारभार चालतो.

४. काही अपवाद वगळता अधिक लोक सेवाभावी संस्थांना धन संचयाचे साधन म्हणून अर्थसाहाय्य करतात. सेवाभावी संस्थांना अर्थसाहाय्य देऊन त्याद्वारे विविध सवलती

पदरात पाडून घेण्याची धनिक लोकांची वृत्ती, जसे करांत सवलती अशी वृत्ती बळावते.

५. शासनाच्या अनुदानावर चालणाऱ्या सेवाभावी संस्था स्वतंत्र नसतात. प्रकल्पाची उद्दिष्टे, स्वरूप, व्याप्ती, खर्च इत्यादीबाबत नोकरशाहीचे आदेश पाळावे लागतात. शासनाचे अनुदान मिळत असल्यास स्वयंसेवी संस्थांना केवळ शासनाच्या विस्तार संस्था म्हणून काम करावे लागते.

६. धनिक, राज्यकर्ते आपल्या सत्तास्थानास धोका पोहोचू नये म्हणून सेवाभावी संस्थांचा वापर करत असल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसून येते. केवळ काही धनिकांकडून देणग्या मिळविण्याच्या हेतूने काही सेवाभावी संस्थांची स्थापना केली जात असल्यामुळे संस्थेच्या मूळ उद्दिष्टांशी प्रतारणा होते.

७. बहुतेक शासकीय अधिकारी सेवाभावी संस्थेच्या कार्यकर्त्यांना दूर ठेवण्याची भूमिका घेतात. सरकारच्या विकास कार्यक्रमांची उद्दिष्टे, नियमावली, कार्यपध्दती, आर्थिक तरतूद इत्यादीविषयी माहिती देत नाही. सेवाभावी संस्थांचा विकास कार्यक्रमातील सहभाग त्यांना आवडत नाही.

८. स्वयंसेवी संस्थांचे मुख्य उद्दिष्ट आदिवासी व ग्रामीण जनतेला स्वावलंबी बनविणे हे असते, पण त्यामुळे लाभार्थी परावलंबी बनतात. स्वयंसेवी संस्थांकडून त्यांच्या अपेक्षा वाढतात. स्वत:चा उद्धार स्वत:ला करावा लागतो हे ते विसरतात. त्यांच्यामध्ये विनाकष्ट, मोफत सर्व मिळावे अशी प्रवृत्ती निर्माण होते. आपल्याकडे जे येतात ते स्वार्थ साधण्यासाठी, आपले शोषण करण्यासाठी येतात असा त्यांचा पक्का पूर्वग्रह आहे. सेवाभावी कार्यकर्ते हे त्यांना उपरे वाटतात.

वरील सर्व समस्या विचारात घेऊन स्वयंसेवी संस्थांना भेडसावणाऱ्या समस्यांवर मात केल्यास शासन व बिगर सरकारी संघटना यांच्यात विविध भूमिकांवर समन्वय साधता येणे सहज शक्य आहे. शासन व बिगर सरकारी संघटना ह्या दोहोंची उद्दिष्टे एकच, ग्रामीण विकास हे आहे. त्यांच्या तात्त्विक भूमिकेचा विचार करता सरकारी व बिनसरकारी संघटनांनी एकमेकांविषयीचे गैरसमज, पूर्वग्रह दूर करून विकास कार्यात परस्परांचे अस्तित्व मान्य करावे. शासनाने स्वयंसेवी संस्थांमधील सेवावृत्ती, अनुभव व कौशल्य यांचा उपयोग विकास कार्यात करावा. तर स्वयंसेवी संस्थांनी शासनाकडून निधी घेण्यात कमीपणा मानू नये. विकास कार्याच्या पातळीवर विचार करता ज्या कामासाठी जास्त निधी, मोठी प्रशासकिय यंत्रणा व कायद्याचे पाठबळ लागते ती कामे सरकारने करावी, तर ज्या कामासाठी कमी निधी, कार्यकर्त्यांची गरज व लहान संघटन लागते ती कामे स्वयंसेवी संस्थांनी करावी.

भारतातील आदिवासी व ग्रामीण विकासाचा प्रश्न सोडविणे अवघड आहे, परंतु अशक्य मात्र नाही. म्हणूनच आदिवासी व ग्रामीण विकास साध्य करण्यासाठी सरकारी व बिगर सरकारी संघटनांनी एकत्रित येणे, एकत्रित राहणे व एकत्रित काम करणे आवश्यक आहे.

• • •

# नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विकासात बाएफ मित्र या स्वयंसेवी संस्थेचे योगदान

प्रा. सुनील पं. उगले
डॉ. डी. आर. बच्छाव

प्रस्तावना

आदिवासींची आर्थिक स्थिती सुधारावी, त्यांचा राहणीमानाचा दर्जा उंचवावा, त्यांना जीवन जगण्याची साधने त्यांच्या आदिवासी भागातच उपलब्ध व्हावीत म्हणून महाराष्ट्र शासन, भारत सरकार तसेच विविध स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते व विविध महामंडळे आपापल्या परीने प्रयत्न करीत आहेत. तरीही अदिवासी समाज आजही विकासाच्या प्रवाहापासून दूरच आहे. वाढती लोकसंख्या व नानाविध समस्या यामुळे शासनाच्या प्रयत्नांना मर्यादा येत आहेत. त्याकरिता आदिवासी समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी शासनाच्या जोडीला विविध स्वंसेवी संस्था कार्य करताना दिसतात.

आदिवासी कल्याणासाठी १९८३ पासून स्वतंत्र आदिवासी विकास विभागाची निर्मिती करण्यात आली. आदिवासी कल्याणाच्या योजनांची माहिती आदिवासी जनतेपर्यंत पोहोचवून शासन व आदिवासी समाज यांच्यामध्ये विश्वासाची भावना निर्माण व्हावी म्हणून या विभागामार्फत प्रयत्न केला जात आहे. मात्र शासनाला पाहिजे तसे यश मिळाले नाही. भारतीय आर्थिक नियोजनाची ५८ वर्षे झाली असतानाही येथील सामान्यांच्या विशेषत: सामाजिक, आर्थिक परिस्थितीत पुरेसा फरक पडल्याचे पाहावयास मिळत नाही.

२००१ मध्ये भारताची एकूण लोकसंख्या १०२.७ कोटी होती. त्यात अनुसूचित जातीची लोकसंख्या १६.६ कोटी तर अनूसूचित जमातीची लोकसंख्या ८.४३ कोटी इतकी होती. तर याच कालखंडात महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ९.६८ कोटी असून त्यात आदिवासी लोखसंख्या ८५.७७ लाख इतकी होती. महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या व आदिवासी लोकसंख्या यांची तुलना केल्यास आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ८.८५ टक्के इतके आहे. आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण लक्षात घेता या सर्व योजना आदिवासींपर्यंत पोहोचविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांचाही सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. त्यासाठी अनेक स्वयंसेवी संस्था १८६७ पासून आदिवासी व ग्रामीण भागात कार्य करीत आहेत. शासनाच्या प्रयत्नाला यश आणावयाचे असेल तर शासनाच्या मदतीला स्वयंसेवी संस्थांचाही सहभाग आवश्यक आहे. त्यातीलच एक स्वयंसेवी संस्था म्हणजे भारतीय शेती उद्योग संस्था (Bharatiya Agro Industries foundation) बाएफ ही संस्था पुणे जिल्ह्यातील उरुळीकांचन येथे १९६७ मध्ये स्थापन करण्यात आली. ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालणारी बाएफ व तिच्या संलग्न संस्था भारता भर विविध भागात बहुउद्देशीय सर्वांगीण ग्रामीण व आदिवासी कार्यक्रम राबवित आहे. सध्या बाएफ ही स्वयंसेवी संस्था बाएफ डेव्हलपमेंट रिसर्च फाउंडेशन या नावाने ओळखली जाते. तिच्या विविध राज्यात संलग्न संस्था काम पाहतात. महाराष्ट्रात महाराष्ट्र न्हिटट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ट्रान्सफर फॉर रुरल एरियाज (मित्र) ही संस्था बाएफचे कार्य करत आहे. बाएफ-मित्र संस्थेच्या योगदानामुळे नाशिक

जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या आर्थिक स्थितीत कसा बदल झाला, आदिवासी समाजाला त्यांचा कितपत फायदा झाला, योजनांचे संप्रेषण कशा प्रकारे होते व त्याची परिणामकारकता तपासण्यासाठी प्रस्तुत संशोधन विषय घेण्यात आला होता.

### २. समस्येचे स्वरूप व व्याप्ती

बाएफचे कार्य भारतभर तर मित्रचे कार्य महाराष्ट्रभर असले तरी अभ्यासासाठी फक्त नाशिक जिल्हाच विचारात घेतल्यामुळे प्रस्तुत संशोधन हे नाशिक जिल्हा या भौगोलिक मर्यादित येते. संशोधनासाठी नाशिक जिल्ह्याची निवड केलेली असली तरी सर्व मर्यादा लक्षात घेऊन व संस्थेचे कार्य इगतपुरी, पेठ, सुरगाणा, त्र्यंबकेश्वर व कळवण या आदिवासी तालुक्यातच चालू असल्यामुळे याच आदिवासी तालुक्यांपुरते संशोधन मर्यादित होते. या चारही तालुक्यातील १०७ (१०%) आदिवासी लाभार्थींच्या विकासात बाएफ मित्र संस्थेच्या योगदानाचा अभ्यास करण्यात आला.

### ३. संशोधनाची उद्दिष्ट्ये

सदर संशोधन केवळ बाएफ मित्र संस्थेच्या योजनेशी निगडीत असून त्यानुसार उद्दिष्ट्ये निश्चित केली आहेत ती पुढीलप्रमाणे -

१. आदिवासींसाठी कार्यरत असणाऱ्या बाएफ-मित्र या स्वयंसेवी संस्थेच्या योगदानाची आवश्यकता तपासणे.

२. आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी बाएफ - मित्र या संस्थेमार्फत कोणकोणत्या योजना राबविण्यात येतात त्याची माहिती घेणे.

३. बाएफ-मित्र संस्थांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे संप्रेषण कशाप्रकारचे होते त्याचा शोध घेणे.

४. नाशिक जिल्ह्यातील आदिवासी समाजाची आर्थिक स्थिती तपासणे.

५. नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विकासात बाएफ-मित्र संस्थेच्या योगदानाची परिणामकारकता तपासणे.

### ४. संशोधनाची कार्यपद्धती

संशोधनाचा मुख्य उद्देश ज्ञान प्राप्ती करणे हा असल्यामुळे या संशोधनासाठी सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला. संबंधीत समस्येच्या कारणासंबंधीचे वास्तव ज्ञान प्राप्त करून त्या समस्येच्या निराकरणासाठी उपाय सुचविणे हा असल्यामुळे या संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धत निवडण्यात आली.

जनसंख्या-संशोधनासाठी नाशिक जिल्ह्यातील आदिवासी समाज विचारात घेण्यात आला आहे.

नमुना निवड - नाशिक जिल्हा विचारात घेण्यात आला असला तरी सर्व मर्यादा विचारात घेऊन संशोधनासाठी ज्या तालुक्यात प्रत्यक्ष बाएफ मित्र या संस्थेचे कार्य चालू आहे अशा ईगतपुरी, कळवण, सुरगाणा, त्र्यंबकेश्वर व पेठ या आदिवासी तालुक्यांचा विचार करण्यात आला आहे. त्यासाठी संभाव्यता नमुना निवड होण्यासाठी साधा यादृच्छिक नमुना पद्धतीने लाभार्थी निवडण्यात आले.

### ५. लाभार्थी

बाएफ मित्र संस्थेच्या प्रसिद्ध वाडी प्रकल्पात नाशिक जिल्ह्यात सुरुवातीला १०७२ कुटुंबे सहभागी झाली होती. त्यातील १०७ (१०%) कुटुंबांचा संशोधनासाठी उपयोग करून घेण्यात आला. पाचही तालुक्यांतील लाभार्थींची संख्या विचारात घेऊन कोटा पद्धतीने लाभार्थींची तालुकानिहाय निवड केली. त्यात पेठ-२९, सुरगाणा-९, त्र्यंबकेश्वर-२७ व कळवण-१३

लाभार्थींची निवड केली.

**कोष्टक क्र. १**

**निवडलेल्या लाभार्थींची संख्या**

| अ. क्र. | तहसील | लाभार्थींची संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | एकुण |
| १. | सुरगाणा | ७ | २ | ९ |
| २. | कळवण | १० | ३ | १३ |
| ३. | पेठ | २५ | ४ | २९ |
| ४. | त्र्यंबकेश्वर | २१ | ६ | २७ |
| ५. | ईगतपुरी | २४ | ५ | २९ |
| | एकूण | ८७ | २० | १०७ |

संदर्भ - प्रत्यक्ष पाहणीवरून

एकूण १०७ लाभार्थींमध्ये स्त्री लाभार्थींची संख्या २० तर पुरुष लाभार्थी ८७ होते. सर्वात जास्त स्त्री लाभार्थी त्र्यंबकेश्वरमध्ये ६ इतक्या होत्या. तर सर्वात कमी स्त्री लाभार्थींची संख्य सुरगाणात फक्त २ इतकी होती. यावरुन स्त्री लाभार्थ्यांचे प्रमाण फक्त २० (१८.६%) आढळून आले. १०७ लाभार्थी पाच तालुक्यातील ६४ गावात विखुरलेले होते. इगतपुरी तालुक्यांतील चौदा गांवातील २९ लाभार्थी, पेठ तालुक्यातील १७ गावांतील २९, त्र्यंबकेश्वर तालुक्यातील १२ गावांतील २७, कळवण तालुक्यातील ११ गावांतील १३ तर सुरगाणा तालुक्यातील ९ गावांतील ९ लाभार्थी याप्रमाणे एकूण ६४ गावांमधील १०७ लाभार्थी विचारात घेण्यात आले.

### ६. लाभार्थींचे सरासरी वय

लाभार्थी व लाभार्थींचे वय यांचाही जवळचा संबंध असतो. अनुभवी व्यक्ती विविध योजनांचा लाभ घेतात मात्र वय कमी असल्यास अशा बदलत्या घटनेचा तात्काळ स्विकार करत नाहीत. मात्र याठिकाणी बाएफ मित्र संस्थेच्या बाबतीत योजनांचा लाभ घेण्यासाठी तरुणांनी विशेष पुढाकार घेतल्याचे दिसुन येते. जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी पारंपारिक पद्धतीचा त्याग करून नवनवीन कल्पना स्विकारण्याची वृत्ती तरूणांमध्ये आढळुन येते. सर्व लाभार्थींचे वय विचारात घेतल्यास तरूण लाभार्थींचे प्रमाण जास्त दिसुन आले.

**कोष्टक क्र. २**

**लाभार्थींचे सरासरी वय**

| अ. क्र. | तहसील | लाभार्थी | | |
|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | एकुण |
| १. | २० पेक्षा कमी | २ | ३ | ०५ |
| २. | २० ते ३५ | ११ | ४६ | ५७ |
| ३. | ३६ ते ५० | ६ | २४ | ३० |
| ४. | ५१ ते ६० | १ | ९ | १० |
| ५. | ६० पेक्षा जास्त | - | ५ | ०५ |

संदर्भ - प्रत्यक्ष पाहाणी

वरील कोष्टकावरून एकूण लाभार्थींपैकी ५७ लाभार्थींचे वय २० ते ३५ वयोगटातील होते तर ३० लाभार्थींचे सरासरी वय ३६ ते ५० च्या दरम्यान होते. यावरून असे स्पष्ट होते की, योजनांचा लाभ घेणाऱ्यांमध्ये तरूणांचा सहभाग जास्त दिसुन येतो. केवळ १५ लाभार्थींचे वय ५० पेक्षा जास्त होते. तरूणांना विकास कार्यात सहभागी करून घेण्यासाठी बाएफ संस्था यशस्वी झाल्याचे दिसून येते.

### ७. लाभार्थींचे साक्षरता प्रमाण

शिक्षणाच्या माध्यमातून आदिवासी विकास करण्यासाठी आश्रमशाळा ही एक महत्वाची योजना शासनाने राबवून आदिवासी मुलामुलींची शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली. मात्र आजही आदिवासी जमातीमध्ये शिक्षणाबद्दल उदासीनता दिसुन येते. सर्वेक्षणासाठी निवडलेल्या लाभार्थींच्या शैक्षणिक पात्रतेवरून त्यांच्यातील साक्षरतेचे प्रमाण व शिक्षणाचा स्तर पुढीलप्रमाणे दिसुन आला.

**कोष्टक क्र. ३**

**लाभार्थींचे साक्षरता प्रमाण व शिक्षणाचा स्तर**

| अ. क्र. | शिक्षणाचा स्तर | लाभार्थी | | |
|---|---|---|---|---|
| | | स्त्रिया | पुरुष | एकुण |
| १. | अशिक्षित | ८ | २३ | ३१ (२८.९%) |
| २. | प्राथमिक | ४ | ३३ | ३७ (३४.६%) |
| ३. | माध्यमिक | ७ | १८ | २५ (२३.३%) |
| ४. | उच्चमाध्यमिक | १ | ९ | १० (९.३%) |
| ५. | पदवीधर | - | ४ | ४ (३.७%) |
| | एकूण | २० | ८७ | १०७ (१००) |

संदर्भ - प्रत्यक्ष पाहणीवरून

वरील कोष्टकावरून नाशिक जिल्ह्यातील आदिवासी लाभार्थींच्या शिक्षणाची कल्पना येते. विशेषतः आजही इतर पुढारलेल्या समाजाप्रमाणे पुरूषापेक्षा स्त्रियांच्या शिक्षणाचा स्तर कमी दिसुन येतो. शिवाय पुरूषांपेक्षा स्त्रीयांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण जास्त दिसुन आले. एकूण लाभार्थींपैकी ३१ (२८.९%) लाभार्थी निरक्षर असून फक्त ४ (३.७%) लाभार्थींनी पदवी प्राप्त केली आहे. विशेषतः एकूण २० स्त्री लाभार्थींपैकी ८ स्त्री लाभार्थी निरक्षण आहेत व एकही पदवीधर नाही म्हणजेच स्त्री लाभार्थींमध्ये निरक्षरतेचे प्रमाण ४% एवढे आहे. कोणत्याही समाजाच्या सुधारणेचा पाया शिक्षण हा आहे. मागासलेल्या समाजात शिक्षण नसेल तर आर्थिक, सामाजिक प्रगतीसाठी कितीही प्रयत्न केले तरी ते निष्फळ ठरतात.

मात्र या ठिकाणी महिलांमध्ये निरक्षरता जास्त असली तरी विशेषतः महिला बचत गटामध्ये त्यांनी सक्रीय सहभाग घेतल्याचे दिसुन येते. यावरुन निरक्षरता हा त्यांच्या मार्गात महत्वाचा अडथळा ठरला असे म्हणता येणार नाही.

### ८. आदिवासी लाभार्थींची जमात

भारतात ४२७ अनुसुचित जनजाती असून २००१ च्या जनगणनेनुसार भारतातील आदिवासी संख्या ८.४३ कोटी होती. एकूण लोकसंख्येच्या हे प्रमाण ८.५% इतके होते. तर याच कालखंडात महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ८.८५% होते. नाशिक जिल्ह्यात आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण २३.९% आहे. या देशातील मूळ रहिवासी म्हणून डॉ. इल्विन तसेच ठक्कर बाप्पा यांनी त्यांना आदिवासी म्हटले आहे. डॉ. धुर्ये त्यांचा उल्लेख मागासलेले हिंदू असा करतात. तसेच वनात राहणारे म्हणुन वन्यजाती असेही म्हणतात तर भारतीय संविधनातील कलम ३४१ व ३४२ मध्ये केलेल्या तरतुदीनुसार तयार केलेल्या सुचित समाविष्ट करण्यात आलेल्या या जनसमुहांना अनुसूचित जनजाती म्हणतात.

महाराष्ट्रातील जिल्हानिहाय आदिवासी जमातीची लोकसंख्या कमी अधिक प्रमाणात आढळून येते. नाशिक जिल्ह्यात सर्वेक्षणामध्ये प्रामुख्याने कोकणा, महादेव कोळी, ठाकुर, वारली, कातकरी व पारधी जमाती आढळून आल्या.

कोष्टक क्र. ४

लाभार्थी आदिवासी जमातीचे प्रमाण

| अ.क्र. | अनुसूचित जमात | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १. | कोकणा | ५३.२ |
| २. | महादेव कोळी | २३.३ |
| ३. | ठाकूर | १९.६ |
| ४. | पारधी | १.८ |
| ५. | कातकरी | ०.९ |
| ६. | वारली | ०.९ |

संदर्भ - प्रत्यक्ष पाहणीवरून

वरील कोष्टकावरून नाशिक जिल्ह्यात कोकणा जमातीचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ५३.२% आढळून आले. विशेषत: पेठ व सुरगणा तालुक्यात कोकणा जमातीचे लोक जास्त प्रमाणात राहतात. पश्चिम उत्तर भागामध्ये त्यांचे वास्तव्य जास्त आहे. त्या खालोखाल महादेव कोळी जमातीचे प्रमाण २३.३% आहे. ठाकुर जमातीचे प्रमाण १९.६% असून त्यांचे वास्तव्य फक्त ईगतपुरी व पेठ तालुक्यात आहे. पारधी, कातकरी व वारली या तिनही जमातीचे प्रमाण नाशिक जिल्ह्यात नगण्य आहे. नाशिक जिल्ह्यात कोकणा, महादेव कोळी, ठाकुर, पारधी, वारली व कातकरी यांचे प्रमाण कमी अधिक असले तरी त्यांची आर्थिक स्थिती जवळपास सारखीच दिसते.

### ९. लाभार्थींचे सरासरी वार्षिक उत्पन्न

आदिवासी समाजाचे एकूण वार्षिक उत्पन्न विचारात घेतल्यास खऱ्या अर्थाने त्यांच्या आर्थिक स्थितीची कल्पना येते, बाएफ मित्र संस्थेच्या नाशिक जिल्ह्यातील लाभार्थी आदिवासी कुटुंबाची पाहणी केली असता त्यांचे सरासरी वार्षिक उत्पन्न खालील प्रमाणे दिसून आले.

कोष्टक क्र. ५

लाभार्थींचे सरासरी वार्षिक उत्पन्न

| अ. क्र. | सरासरी वार्षिक उत्पन्न | लाभार्थी संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | १०००० पेक्षा कमी | १३ | १२.१ |
| २. | १०००१ ते २०००० | ४३ | ४०.१ |
| ३. | २०००१ ते ३०००० | २८ | २६.१ |
| ४. | ३०००१ ते ५०००० | १४ | १३.० |
| ५. | ५०००१ ते ६०००० | ०८ | ८.४ |
| ६. | ६०००१ पेक्षा जास्त | ०१ | ०.९ |

संदर्भ - प्रत्यक्ष पाहणीवरुन

आदिवासी व्यक्तींना वर्षभरात विविध मार्गांनी जे वार्षिक उत्पन्न मिळते त्यावरुन त्या समाजाची कल्पना येते. यापुर्वी संशोधकाने एमीफल पदवीसाठी आदिवासींच्या आर्थि क स्थितीचा अभ्यास केला होता. त्यावरुन दिंडोरी तालुक्यातील आदिवासी समाजाची आर्थिकस्थिती फारच हलाखीची असल्याचे आढळुन आले होते. त्या सर्वेक्षणात १०० व्यक्तीपैकी फक्त २ व्यक्तींचे वार्षिक उत्पन्न २० हजारापेक्षा जास्त आढळुन आले होते. तर सर्वाधिक ४८ व्यक्तींचे उत्पन्न ५ ते १० हजाराच्या दरम्यान होते असा निष्कर्ष निघाला होता मात्र या सर्वेक्षणामध्ये आदिवासी समाजाची आर्थिकस्थिती समाधानकारक दिसून आली. कारण फक्त १२.१% लाभार्थींचे उत्पन्न १० हजारापेक्षा कमी आहे. तर ४०% पेक्षा जास्त आदिवासी कुटुंबाचे उत्पन्न १० ते २० हजार या दरम्यान होते, ५० हजारापेक्षा जास्त उत्पन्न असणारे लाभार्थी ८.४% सतके आढळून आले, यावरून आदिवासींच्या उत्पन्नात समाधानकारक वाढ झाली आहे हे स्पष्ट होते.

नाशिक जिल्ह्यातील लाभार्थी आदिवासी कुटुंबाची आर्थिक पहाणी केली असता त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली का ? अशी विचारणा केली असता ५७.९% लाभार्थींनी उत्पन्नात वाढ झाल्याचे मान्य केले. या वरुन संस्थेच्या कार्याच्या यशस्वीतेची कल्पना येते. आदिवासी व्यक्तींना विविध मार्गांनी उत्पन्न मिळत असते केवळ एकूण वार्षिक उत्पन्नावरून संस्थेच्या योगदानाची कल्पना येणार नाही. त्यामुळे केवळ संस्थेच्या योगदानामुळे वार्षिक उत्पन्नात किती वाढ झाली याचा आढावा घेण्यात आला त्यावरून अवघ्या ७-८ वर्षाचा कालावधीत संस्थेने ज्या योजना राबविल्या त्यामुळे उत्पन्न समाधानकारक रित्या वाढल्याचे दिसुन येते. काही लाभार्थींच्या उत्पन्नात वाढ झाली नसली तरी आपले उत्पन्न वाढेल असा आशावाद त्यांच्यात दिसून आला.

बाएफ मित्र या संस्थेच्या विविध योजनामुळे लाभार्थींच्या आर्थिक परिस्थितीत खरच बदल झाला का याची स्पष्ट कल्पना यावी म्हणून सर्वेक्षणात लाभार्थी कुटुंबाप्रमाणेच बिगर लाभार्थी कुटुंबाचा समावेश करण्यात आला. लाभार्थी व बिगर लाभार्थी यांच्या वार्षिक उत्पन्नाची तुलना केली असता बिगर लाभार्थी पेक्षा लाभार्थीचे उत्पन्न जास्त असल्याचे आढळून आले. यावरून बाएफ मित्र या संस्थेच्या योजनांमुळे आर्थिक स्थिती सुधारली हे स्पष्ट दिसून येते.

बिगरलाभार्थी मधील २०.५% व्यक्तीचे वार्षिक उत्पन्न १०००० पेक्षा कमी आढळून आले तर लाभार्थीमध्ये हेच प्रमाण १२.१% आहे. याचा अर्थ बिगरलाभार्थी मध्ये हलाखीचे जीवन जगणाऱ्यांचे प्रमाण जास्त दिसून येते. यावरून बाएफ मित्र संस्थेच्या योगदानामुळे आदिवासींच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होत आहे हे स्पष्ट होत आहे.

२००७ च्या नियोजन मंडळाच्या निकषाचा आधार घेतल्यास ३ व्यक्तींच्या कुटुंबाचा वार्षिक खर्च रु. २४००० दारिद्रय रेषेसाठी ग्राहय धरला आहे. मात्र सर्वेक्षित लाभार्थी आदिवासी कुटुंबाचे सरासरी आकारमान ६ आहे यासाठी त्यांना रु. ४८०००० खर्च अपेक्षित आहे. हा निकष ग्रहीत धरला तर एकूण २१.५% टक्के लाभार्थी कुटुंब दारिद्रय रेषेच्यावर जीवन जगत आहे असा अर्थ होतो. तर ७८५% टक्के लाभार्थी कुटुंबे दारिद्रय रेषेखाली आहे असे दिसते. मात्र प्रत्यक्ष लाभार्थींना आपण दारिद्रय रेषा ओलांडली का ? असा प्रश्न विचारला असता १४.९ टक्के लाभार्थींनी होय असा प्रतिसाद दिला. एकूण वार्षिक उत्पन्नावरून २१.५ टक्के लाभार्थींनी तर त्यांच्या प्रतिसादावरून १४.९ टक्के लाभार्थींनी दारिद्रय रेषा ओलांडल्याचे स्पष्ट होते. यात बाएफ मित्रच्या योगदानामुळे दारिद्रय रेषा ओलांडण्यात यश आल्याचे १४.९ टक्के लाभार्थींनी मान्य केले तर ५६ टक्के लाभार्थींनी दारिद्रय रेषा ओलांडण्याची अपेक्षा आहे असे नमुद केले. यावरून बाएफ मित्र संस्थेच्या योगदानाची कल्पना येते.

**१०. लाभार्थींना उपलब्ध झालेला स्वयंरोजगार**

विशेषत: भूमिहिनांना उत्पन्नाचे शाश्वत साधन उपलब्ध करून देण्यासाठी बाएफ मित्र संस्थेमार्फत भुमिहीन विकास कार्यक्रम राबविला जातो. बाएफ मित्र संस्थेच्या कार्यक्षेत्रातील २० ते ३० आदिवासी कुटुंबाकडे जमीन नाही. कौशल्य, आवड व क्षमता अशा घटकांचा विचार करुन भूमिहिनांना स्वयंरोजगाराचे उपक्रम दिले जातात. बाएफ मित्र संस्थेच्या भूमिहिन विकास कार्यक्रमांतर्गत १०७ लाभार्थीपैकी २३ लाभार्थींनी वेगवेगळ्या प्रकारच्या स्वयंरोजगाराचा लाभ घेतलेला

आहे. भूमिहिनांना आपल्या घराजवळ, गावात अथवा गावाशेजारील रोजगार उपलब्ध करून दिल्याने त्यांना उत्पन्नाचे कायम स्वरूपी साधन उपलब्ध झाले आहे. एकंदरीत भूमिहिनांना स्वत:च्या पायावर उभे राहता यावे या उद्देशाने संस्थेमार्फत भूमिहिन विकास कार्यक्रम राबविला जातो.

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी तालुक्यात बाएफ मित्र चे कार्य सर्वदूर पसरत आहे. संस्थेच्या प्रसार व प्रचारामध्ये बाएफ मित्रचे कर्मचारीच प्रत्यक्ष आदिवासीच्या घरी जाऊन संस्थेविषयी व योजनेविषयी माहिती पुरवितात. ७२.८% लाभार्थींनी विविध माहिती कर्मचाऱ्याकडून मिळाली असे नमूद केले यावरून मित्र च्या कर्मचारी वर्ग आदिवासीच्या पोहोचल्याचे दिसून येते.

नाशिक जिल्ह्यातील पाचही अविासी तालुक्यात बाएफ मित्र संस्थेच्या विविध योजना आदिवासीपर्यंत पोहोचल्या असून त्याचे श्रेय बाएफ मित्रची यंत्रणा व कर्मचारी यांना जाते कारण लाभार्थी कुटुंबांना माहिती मिळण्याचे अनेक स्त्रोत असूनही सर्वात जास्त म्हणजे ७२.८% लाभार्थंना बायफ मित्र कर्मचाऱ्याकडून माहिती मिळाली असे पाहणीत दिसून आले.

**११. योजना माहिती असणाऱ्यांचे प्रमाण व प्रत्यक्ष लाभार्थी संख्या**

सध्या ग्रामीण व आदिवासी भागात शासनाच्या मदतीने संस्था अनेक योजना राबवत आहे. त्यातील अनेक योजना प्रत्यक्षात अदिवासींपर्यंत पोहोचवण्यात संस्थेला यश आले आहे. कारण बहुतांशी योजना लाभार्थींना माहित असल्याचे दिसून आले. कोणत्याही योजनेचा लाभ तेव्हाच घेतला जातो जेव्हा अशा योजनांविषयी सविस्तर माहिती असते. वाडी योजनेविषयी माहिती असल्यामुळे या योजनेचे लाभार्थीही सर्वाधिक आहेत.

**कोष्टक क्र. ६**

**योजना माहिती असणाऱ्यांचे प्रमाण व प्रत्यक्ष लाभ घेतलेल्या लाभार्थींची संख्या**

| अ. क्र. | योजना | योजना माहिती असणाऱ्या लाभार्थींची संख्या | प्रत्यक्ष लाभ घेतलेल्या लाभार्थींची संख्य |
|---|---|---|---|
| १. | पशुधन कार्यक्रम | १७ | ०४ |
| २. | बचतगट | ६५ | ४१ |
| ३. | आरोग्य विषयक | ३१ | ७० |
| ४. | भूमिहिन योजना | २७ | १० |
| ५. | वाडी लागवड | १०२ | ८७ |
| ६. | पाणलोट कार्यक्रम | १४ | ०४ |
| ७. | जनउत्कर्ष कार्यक्रम | १६ | ०२ |
| ८. | कृषी योजना | १९ | ११ |
| ९. | स्वयंरोजगार | २५ | २३ |
| १० | रोपवाटिका | ०८ | १२ |
| ११ | जलस्त्रोत कार्यक्रम | १४ | २८ |

**संदर्भ प्रत्यक्ष पाहणीवरून**

वरील कोष्टकावरून नाशिक जिल्ह्यातील एकूण १०७ लाभार्थींपैकी सर्वाधिक १०२ लाभार्थींना वाडी लागवड योजनेविषयी माहिती आहे. तर ८१.३ टक्के लाभार्थींनी वाडी लागवड केली आहे. यावरून ही योजना किती लोकप्रिय आहे याची कल्पना येते. ही योजना अत्यंत लोकप्रिय असून 'वाडी मॉडेल' हे आदिवासी विकासासाठी वरदान ठरले आहे. वाडी प्रकल्पा खालोखाल ६०.७ टक्के लाभार्थींना स्वयंसाह्यता बचत गटाबाबत माहिती आहे. महिलांमधील बचतगटाची

चळवळ जोमाने सुरु असून ३८.३% लाभार्थींनी बचतगटाची स्थापना केली आहे. या शिवाय ९.३ टक्के लाभार्थींना भूमिहिन विकास कार्यक्रमातर्गत स्वयंरोजगार प्राप्त झाला आहे. आरोग्यविषयक जनजागृती आदिवासी बांधवांमध्ये होत आहे. कारण एकूण लाभार्थींपैकी ३१ लाभार्थींना आरोग्य विषयक योजनेची माहिती आहे मात्र प्रत्यक्षात लाभार्थींची संख्या जास्त म्हणजे ७० इतकी आहे. यावरून योजनेचा लाभ घेतलेला असुनही माहिती नाही असे सांगणाऱ्याचे प्रमाण जास्त दिसून येते.

फळबाग लागवड, आरोग्यविषयक योजना, बचत गट, जलस्त्रोत विकास कार्यक्रम यांच्या लाभार्थींची संख्या सर्वाधिक आहे. पशुधन विकास कार्यक्रम, स्वयंसहाय्यता बचतगट, आरोग्य विषयक योजना, भूमिहिन योजना, वाडी लागवड, पाणलोट कार्यक्रम, जनउत्कर्ष कार्यक्रम, कृषीविषयक योजना, रोपवाटीका, पाणी शुद्धीकरण व जलस्त्रोत कार्यक्रम अशा अनेक योजना तळागाळातील व दऱ्याखोऱ्यातील आदिवासींपर्यत पोहोचविण्यात बाएफ मित्रला यश आले आहे. तसेच प्रत्यक्ष लाभ कसा घेतला जाईल यासाठी संस्था विशेष प्रयत्न करत आहे. नाशिक जिल्ह्यातील पाचही आदिवासी तालुक्यात संस्थेच्या विविध योजना आदिवासींपर्यंत पोहोचविण्यात बाएफमित्रला यश आले आहे.

### १२. सहसंबंध व सहसंबंध गुणांक

संकलित तथ्यांना संक्षिप्त केल्यामुळें तथ्यांचे केवळ निरपेक्ष परिणाम प्राप्त होतात परंतु ते अधिक उपयुक्त नसतात. त्यामुळे तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन सुलभ होत नाही त्याकरीता तथ्यांना अधिक उपयुक्त करण्यासाठी तथ्यांच्या विविध श्रेणीमध्ये आढळणारे परस्पर संबंध स्पष्ट करणे आवश्यक असते. तथ्यांच्या विविध श्रेणीम ेल पारस्पारिक संबंध सहसंबंधाच्या पद्धतीद्वारे स्पष्ट केले जातात. म्हणून संशोधनात सहसंबंधाचा उपयोग करावा लागतो.

सहसंबंध म्हणजे दोन किंवा अधिक चलांमध्ये सहसंबंधाच्या मात्राचे माप होय. दोन चलांमधील कोणते पारस्पारिक संबंध आहे. तसेच त्या चलामधील कार्यकारण संबंध कोणते आहेत, याचे विश्लेषण सहसंबंधाद्वारे केले जाते. तथ्यांच्या दोन श्रेणीमध्ये परस्पर संबंध असतात. एका श्रेणीमधील परिवर्तनाचा प्रभाव दुसऱ्या श्रेणीवर देखील पडतो म्हणून दोन श्रेणी परस्पर संबंधीत असतात. तथ्यांच्या एका श्रेणीमध्ये होणाऱ्या परिवर्तनामुळे दुसऱ्या श्रेणीमध्ये परिवर्तन होते म्हणजेच एका श्रेणीत वृद्धी किंवा घट झाल्यास दुसऱ्या श्रेणीमध्ये देखील त्याच दिशेने किंवा उलट दिशेने परिवर्तन होते आणि त्याचबरोबर त्यांच्यात कार्यकारण संबंध असतो त्यास सहसंबंध म्हणतात.

सहसंबंधाचे मात्रात्मक आणि गुणात्मक असे दोन प्रकार आहेत. मात्रात्मक सहसंबंधाचे ऋणात्मक, धनात्मक व शुन्य असे तीन उपप्रकार आहेत. गुणात्मक सहसंबंधाचे रेखीय सहसंबंध आणि वक्रात्मक सहसंबंध असे दोन प्रकार पडतात.

### १३. सहसंबंध गुणांक

कोणत्याही दोन चलांच्यामधील संबंधाची घनिष्ठता, मात्रा किंवा विस्तार जाणून घेण्यासाठी सहसंबंधाच्या गुणांकाची गणना केली जाते. म्हणजेच कोणत्याही दोन चल किंवा व्यक्तींच्या परस्पर संबंधांना ज्या आकड्यांद्वारे व्यक्त केले जाते त्यास सहसंबंधाचा गुणांक असे म्हणतात. हा अशा प्रकारचा संकेतांक आहे की, जो दोन चलांमध्ये आढळणाऱ्या सहसंबंधाचे गुण

आणि मात्रांना व्यक्त करतो. संख्याशास्त्रात सर्व गोष्टी संख्येत किंवा गुणांकात सांगाव्या लागतात. सहसंबंध ज्या संख्येने वा अंकाने दाखवला जातो त्याल सहसंबंध गुणांक म्हणतात. म्हणजे दोन बदलणाऱ्या चलामध्ये सहसंबंध काढला जातो. मात्र ह्या दोन चलांमधील सहसंबंध नेहमी स्थिर म्हणजे न बदलणारा असतो त्याला अचल किंवा स्थिरांक म्हणतात. कार्ल पियर्सन यांनी सहसंबंधाचा गुणांकाची काही महत्वाची वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

१. दिशाचे ज्ञान : सहसंबंधाच्या गुणांकापासुन सहसंबंधाच्या दिशाची माहिती मिळते. गुणांकात धन चिन्ह धनात्मक संबंधाचे द्योतक आहे. आणि ऋण चिन्ह हे ऋणात्मक सहसंबंध दर्शविते.

२. मात्रा आणि सीमा : यामुळे सहसंबंधाच्या मात्राचे संख्यात्मक माप प्राप्त होते. या गुणांकाचे माप नेहमीच + १ आणि - १ यामध्ये असते. + १ असल्यास पूर्ण धनात्मक आणि - १ असल्यास पूर्ण ऋणात्मक सहसंबंध आढलतो. जर गुणांक ० असेल तर सहसंबंध अजिबात नसतो. जस-जसे या गुणांकाचे माप ० पासून १ कडे वाढ जाते तस-तसे सहसंबंधाची मात्रा देखील वाढत जाते.

३. आदर्श माप : हे गुणांकाचे आदर्श माप आहे. कारण हे समांतर मध्य आणि मानक विचलनावर आधारित आहे. ते विविध बीजगणितीय गुणांमुळे उच्चतर सांख्यिकीय पद्धतीकरिता सर्वोत्कृष्ट माप आहे.

४. सहविचलनाची मात्रा : सहसंबंधाचा गुणांक काढण्यासाठी प्रत्येक समं श्रेणीमध्ये समांतर मध्यापासुन विचलनांची मात्रा माहीत करून घ्यावी लागते. त्यानंतर दोन श्रेणीच्या त्यासंबंधी विचलनाचे गुणाकार करून जो गुणाकार येतो. त्या गुणाकारच्या बेरजेस मूल्याच्या संख्येने भाग दिला जातो. अशा प्रकारे दोन श्रेणीच्या सहविचलनाची मात्रा माहीत केली जाते. सहसंबंधाच्या गुणांकाची गणना करण्यासाठी कार्ल पियर्सन, स्पिअरमन व पिअरमन यांनी सहसंबंधाचा गुणांक काढण्यासाठी पद्धती सांगितल्या आहे.

व्यावहारिक परिस्थितीत सहसंबंध गुणकाची किंमत नेहमी अपूर्णांकातच येते. गुणांकावरून त्याचा अन्वयार्थ कसा लावला जातो हे पुढील कोष्टकावरून समजते.

**कोष्टक क्र. ७**

**सहसंबंध गुणकाची किंमत व त्याचा अन्वयार्थ**

| सहसंबंध गुणकाची किंमत | सहसंबंध गुणकाची अन्वयार्थ |
|---|---|
| +/-०.२० पेक्षा कमी | शुन्य सहसंबंध |
| +/-०.२० ते ०.३९ | अल्प पण निश्चित सहसंबंध |
| +/-०.४० ते ०.६९ | वैद्य आणि विश्वसनिय सहसंबंध |
| +/-०.७० ते ०.८९ | उच्च सहसंबंध |
| +/-०.९० ते १.०० | आदर्श सहसंबंध |

बाएफ मित्र संस्थेच्या लाभार्थींचे शिक्षण व लाभ घेतलेल्या योजनांची संख्या, लाभार्थींचे वय व लाभ घेतलेल्या योजनांची संख्या, लाभार्थींचे वय व शिक्षण, शिक्षण व कुटुंबाचा आकार, शिक्षण व उत्पन्न आणि योजनांची माहिती असणारे व प्रत्यक्ष योजनांचा लाभ

घेतलेले लाभार्थींची संक्या अशा दोन चलांच्या आधारे सहसंबंध काढला असता पुढीलप्रमाणे सहसंबंध आढळून आला.

**कोष्टक क्र. ८**

**दोन भिन्न चलामधील सहसंबंध**

| अ.क. | X | Y | गुणांक सहसंबंध | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | वय | लाभ घेतलेल्या योजना | -०.२९ | ऋण सहसंबंध म्हणजेच अल्प पण निश्चित सहसंबंध |
| २.. | वय | शिक्षण | -०.६४ | ऋण सहसंबंध म्हणजेच वैद्य आणि विश्वसनिय सहसंबंध |
| ३. | शिक्षण | लाभ घेतलेल्या योजना | +०.४५ | धन सहसंबंध म्हणजेच वैद्य आणि विश्वसनीय सहसंबंध |
| ४. | शिक्षण | कुटुंबाचा आकार | +०.१६ | धन सहसंबंध म्हणजेच शुन्य सहसंबंध |
| ५. | योजनांची माहिती | योजना लाभार्थी | +०.८६ | धन सहसंबंध म्हणजेच उच्च सहसंबंध |
| ६. | शिक्षण | उत्पन्न | +०.२० | धनसहसंबंध म्हणजेच अल्पपण निश्चित सहसंबंध |

निष्कर्ष

१. बाएफ मित्र संस्थेच्या लाभार्थींचे वय व लाभ घेतलेल्या योजनांची संख्या या दोन गुणविशेषात ऋण सहसंबंध म्हणजेच अल्प पण निश्चित सहसंबंध (-०.२९) दिसुन येतो. ज्या लाभार्थींचे वय जास्त आहे. अशा लाभार्थींनी कमी योजनांचा लाभ घेतलेला आहे. याउलट ज्या लाभार्थींचे वय कमी आहे अशा लाभार्थींना जास्तीत जास्त योजनांचा लाभ घेतलेला आहे. यावरून तरूण वर्गात योजनांचा लाभ घेणाऱ्यांची संख्या जास्त आढळून आली.

२. लाभार्थींचे वय व शिक्षण या दोन गुणविशेषातही ऋण सहसंबंध म्हणजेच वैद्य आणि विश्वसनीय सहसंबंध (-०.६४) दिसुन आला. ज्या लाभार्थींचे वय कमी आहे अशा लाभार्थींचे शिक्षण जास्त आहे. याउलट ज्या लाभार्तींचे वय जास्त अशा लाभार्थींचे शिक्षण कमी आहे. यावरून तरूण वर्गात शिक्षण घेणाऱ्यांची संख्या जास्त आढळून आली.

३. बाएफ मित्र संस्थेच्या लाभार्थींचे शिक्षण व लाभ घेतलेल्या योजनांची संख्या या दोन गुणविशेशात धन सहसंबंध म्हणजेच वैद्य आणि विश्वसनीय

सहसंबंध (+०.४५) दिसून येतो. ज्या लाभार्थींचे शिक्षण जास्त आहे अशा लाभार्थ्यांनी जास्त योजनांचा लाभ घेतलेला आहे. याउलट ज्या लाभार्थींचे शिक्षण कमी किंवा जे लाभार्थी निरक्षर आहे अशा लाभार्थींनी कमीत कमी योजनांचा लाभ घेतलेला आहे.

४. शिक्षणाचा कुटुंबाचा आकारावर फारसा परीणाम झाल्याचे दिसुन येत नाही. शिक्षण व कुटुंबाचा आकार यांच्यामध्ये धन सहसंबंध परंतु शुन्य सहसंबंध (+०.१६) दिसुन येतो. कारण शिक्षण जास्त असणाऱ्या लाभार्थींच्या कुटुंबाचा आकारही जास्त दिसून आला.

५. लाभार्थ्यांचे शिक्षण व सरासरी वार्षिक उत्पन्न या दोन गुणविशेषात धन सहसंबंध म्हणजेच अल्प पण निश्चित सहसंबंध (+०.२०) दिसून येतो. ज्या लाभार्थ्यांचे शिक्षण जास्त आहे अशा लाभार्थ्यांचे सरासरी वार्षिक उत्पन्न जास्त आहे. याउलट ज्या लाभार्थ्यांचे शिक्षण कमी आहे अशा लाभार्थ्यांचे सरासरी वार्षिक उत्पन्नही कमी आहे.

६. योजनांची माहिती असणारे लाभार्थी व प्रत्यक्ष योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थींची संख्या या दोन गुणविशेषात धन सहसंबंध म्हणजेच उच्च सहसंबंध (+०.८६) दिसुन येतो. त्या लाभार्थींना जास्त योजनांची माहिती आहे अशा लाभार्थींनी जास्त योजनांचा लाभ घेतलेला आहे. याउलट ज्या लाभार्थींना कमी योजनांची माहिती आहे अशा लाभार्थींनी कमीत कमी योजनांचा लाभ घेतलेला आहे.

७. एकूण लाभार्थींमध्ये पुरुष लाभार्थी ८१.३% तर स्त्री लाभार्थी प्रमाण फक्त १८.६% आहे. यावरून पुरुष लाभार्थींच्या तुलनेत स्त्री लाभार्थींची संख्या कमी आहे.

८. नाशिक जिल्ह्यात एकूण लाभार्थींमध्ये कोकणा जमातीचे प्रमाण सर्वात जास्त ५३.२% आढळून आले. तर कातकरी व वारली जमातीचे प्रमाण सर्वात कमी म्हणजे ०.९% आढळून आले.

९. नाशिक जिल्ह्यात आदिवासी भागात उत्पादक सदस्याचे प्रमाण स्त्री व पुरुषांच्याबाबतीत सारखेच दिसुन आले. अदिवासी समाजात स्त्रीला समान दर्जा व मानाचे स्थान दिले जाते.

१०. नाशिक जिल्ह्यातील लाभार्थी आदिवासी समाजाची आर्थिक स्थिती समाधानकारक दिसुन आली. लाभार्थी आदिवासीपैकी फक्त १२.१% लाभार्थींचे वार्षिक उत्पन्न दहा हजारापेक्षा कमी आढळुन आले. आदिवासी समाजाची आर्थिक स्थिती सुदारण्यास बाएफ मित्रची मदत झाली हे लाभार्थी मान्य करतात.

११. आरोग्य विषयक योजनांची माहिती असणाऱ्यापेक्षा लाभार्थींची संख्या अधिक दिसुन आली. यावरून योजनांची माहिती व लाभ घेतला असुनही माहिती नाही असे सांगण्याची वृत्ती यावरून दिसुन येते.

**सारांश**

आदिवासी समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी शासनाच्या जोडीला बाएफ मित्र या स्वयंसेवी संस्थेची खऱ्या अर्थाने मदत होताना दिसते. ना नफा ना तोटा या तत्वावर चालणारी बाएफ मित्र संस्था विविध भागात बहुउद्देशीय सर्वांगीण व आदिवासी कार्यक्रम राबवत आहे. अनेक योजना तळागाळातील व दऱ्याखोऱ्यातील आदिवासीपर्यंत पोहोचविण्यात बाएफमित्रला यश आले आहे. तसेच प्रत्यक्ष लाभ कसा घेतला जाईल यासाठी संस्था विशेष प्रयत्न करत आहे. नाशिक जिल्ह्यातील पाचही अदिवासी तालुक्यात संस्थेच्या विविध योजना आदिवासींपर्यंत पोहोचल्या आहेत. संस्थेच्या योगदानामुळे नाशिक जिल्ह्यातील अदिवासी समाजाच्या आर्थिक स्थितीत बदल झाल्याचे दिसुन येते.

# आदिवासी लोक जीवन व प्रकृतीतून निर्माण झालेला इतिहास

विरसिंग पाडवी
नंदुरबार

आदिवासी लोकजीवन आणि त्यांची संस्कृती, परंपरा, वारसा व इतिहास सर्व निसर्गसृष्टीची देणगी आहे. आदिवासी संस्कृती परंपरेत निसर्ग सृष्टीतील अनेक घटकांचा संबंध असून त्यात त्याचे प्रतिबिंब, आदिवासी समाज निसर्ग नियमानूसार आपले जीवन जगताना दिसून येतात आणि निसर्ग नियमांचे पालन करतात व आपल्या संस्कृतीचे जीवन मूल्य जपतात. आदिवासी जीवन मूल्यात माणुसकी वर आधारीत तत्त्वे सामावलेली आहेत. समता, समभाव, समानता, एकता आणि शोषण विरहित समाज व्यवस्था व त्याची मूल्ये आदिवासी संस्कृती परंपरेत साठवलेली दिसतात आणि ती मानवी मूल्ये पिढ्या पिढ्यानी अनादी काळापासून आज पावेतो आदिवासी समाजाने जपून ठेवली आहेत. ती परंपरा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सरकत सरकत येत आहे. आदिवासी संस्कृती परंपरेचा इतिहास व वारसा विचार करताना लक्षात येते की आदिवासी संस्कृती परंपरा धर्म पूर्व संस्कृती अजून पावेतो आदिवासी समाजाने ती टिकवून ठेवलेली आहे. मात्र आज सुधारणा, परिवर्तन विकासाच्या नावाखाली तिला कीड लागून नष्ट होऊ पाहात आहे.

आदिवासी संस्कृती परंपरेतचा पायाच निसर्गावर आधारीत असल्याने आदिवासी समाजातील लोक निसर्ग सृष्टीच्या पूजेत अधिक महत्त्व देतात आणि आजही तितक्याच भावने निसर्ग सृष्टीची पूजा ते करीत असतात. 'उदा. निलो नदूऱ्यो किव्हा निलीचारी माटल्यो देव इ.' पावसाळा सुरू झाल्यावर धरती माता सर्व दूर गवत झाडे झुडपे वेली यांना पालवी येऊन हिरवीगार दिसत असते. अशावेळी आदिवासी परिसरात प्रत्येक गावात आदिवासी लोक निसर्ग सृष्टीची पूजा करीत असतात. त्या पूजेला निलो नदूऱ्यो किंवा माटल्यो देव नावाने निसर्ग देवतेची व धरती मातेची पूजा करीत असतात. ह्या निसर्ग देवतेची धरती मातेची पूजा केल्यानंतरच हिरवे गवत, झाडाची पाने, फुले कापून आणतात किंवा तोडतात. निसर्ग देवतेची जो पावेतो पूजा केली जात नाही तो पावेतो. कोणीही निसर्गातील कोणत्याही वनस्पतीला तोडत नाही, हात लावत नाही. जंगलातील पाले भाज्याही तोडून खात नाही. पूजा झाल्यावरच भाजीपाला खायला सुरुवात करतात. तसेच वाघदेवाची पूजा देखील करण्यात येत असते. वाघ म्हणजे जंगलाचा राजा निसर्ग सृष्टीचे प्रतिक, पावसाळी पिके पिकून आल्यावर उदा. मका, चवळी, दोडकी, काकड्या लवकर पिकणारा भात इत्यादी पिकून तयार झालेली असतात; परंतु वाघदेवीची पूजा केल्याशिवाय आदिवासी बांधव वरील फळ भाज्या मका, भात इत्यादी अन्न खायला सुरुवात करीत नाहीत. त्यासाठी गांवकरी एक दिवस ठरवून वाघदेवाची पूजा करतात गावाच्या जवळ पास झाडा झुडपात वाघदेवाची दगड गोटे ठेऊन स्थापना केलेली असते. त्या ठिकाणी जाऊन गावकरी

व गावाचे ज्येष्ठ प्रमुख लोक पुजारी पूजा करतात, त्या दिवशी गांवातील कोणाही कोणत्याही कामाला जात नाही. वाघदेवाची पूजा झाल्यावर एक व्यक्ती वाघाचे सोंग घेऊन पळत असतो दुसरे मातीचे गोळे मारून त्याला पळवून लावतात. अशाप्रकारे निलो नदुऱ्यो व वाघदेवाची पूजा आदिवासी लोक करीत असतात. उद्देश असतो. गावातील परिसरातील लोक सुखी समाधाने राहावे. अन्न धान्य पिकून सर्व संपन्न राहावे. गावात व परिसरात कोणत्याही प्रकारची रोगराई येऊ नये, बाधा येऊ नये, सर्व आनंदाने सुखाने राहावे यासाठीही निसर्ग परंपरेची पूजा करण्यात येत असते. अशाच प्रकारे डोंगराची, उजाड्या देवाची म्हणजे जंगलाची, हिवाऱ्या देवाची म्हणजे गांव परिसराच्या शिवेची, शिवाराची पूजा करण्यात येत असते. अशा प्रकारे सर्व प्रकारच्या पूजा विधी तीवार उत्सव इत्यादी सर्व निसर्गसृष्टीच्या निगडीत आदिवासी संस्कृती परपरेचा व अस्तित्वाचा इतिहास निसर्ग निर्मित कृतीपासून निर्माण झाल्याचे संदर्भ मिळतात. हे संदर्भ आपणास लक्षात आले आहेतच की हे आदिवासींचे उत्सव, तीहार, पूजा विधी इत्यादी प्रमाणेच त्याच्या नावागांवात देखील इतिहास दडलेला सापडतो. तो या धरती वरील डोंगर दरी, नदी, नाले, खडक, दगड, वनस्पती, झाडे-झुडपे, वेली, प्राणी-पक्षी इत्यादीच्या नावाने प्रतिक रूपाने माणसाच्या नावात देखील. उदा. १) लिंबाच्या झाडाच्या नावावरून मुला मुलींची नांवे- लिंबाड्या = लिबडी २) उबाड्याच्या झाडाच्या नांवावरून उबऱ्या = उबरी ३) पिंपळाच्या झाडाच्या नांवावरुन पिंपल्या = पिपली ४) डोगराच्या नांवावरून मुला-मुलींची नांवे - डोंगर - डुंगरी ५) नदीच्या नावावरुन - नर्माद्यो - नर्मदा ६) पक्षांच्या नावावरुन कावळाच्या नांवावरुन कागडा - कागडी ७) कबुतराच्या नावावरुन पेवा - पेरवी ७) प्राण्यांच्या नावावरुन मांजराच्या नांवावरुन बिलाड्या - बिलाडी - बेडकाच्या नांवावरुन डेटका - डेटकी अशा प्रकारे आदिवासी माणसाची नांवे, निसर्गातील घटकाच्या प्रतिक करणारी नांवे ठेवलेली असतात. त्याच प्रमाणे आदिवासी भागातील गांवाची नांवे देखील असतात. ती अशाप्रकारे डोंगर टेकडी प्रतित्व करणारी गांवे १) डुंगरपूर, डोंगरगांव, पाणीच्या ठिकाणी वस्ती झालेली गावे २) आबापाणी, उमरापाणी, केलापाणी, सुळपाणी, कालापाणी इत्यादी. ३) अक्कलकुवा, सेलकुवा, अमरकुवा, झाडाच्या नावावरुन वस्ती झालेली नावे ४) वडा पासून वडगांव, आंब्याच्या झाडापासून आंबापूर, आबेगांव, आबाबारी इत्यादी उमाराच्या झाडापासून उमरगांव, उमरापाणी, उमरपाडा, गुल्याउमर इत्यादी निसर्ग सृष्टी पासून निर्माण झाल्याचे इतिहास दर्शविणारे अशा प्रकारे आपल्या समोर आहेत. आदिवासी माणूस हा या धरतीचा पत्र असून मुळ निवासी आहे येथील धरती आणि धरती वरील निसर्ग सृष्टी त्याचे अस्तित्व दर्शविणारे एकमेव पूरावा आहे.

सुमारे ५००० (पाच हजार) वर्षापुर्वी या भारतीय धरतीवर आदिमानवाची सुरुवात झाली होती त्यानंतर द्वितीय हिम युगाच्या काळात पाषण युगात मानव जीवनाला सुरुवात झाल्याचे मानववंश शास्त्रज्ञाने व इतिहासकाराचे मत आहे.

इतिहास म्हणजे आदिवासी संस्कृती परंम्परेचा इतिहास गतकाळात घडलेल्या घडामोडी, घडलेल्या घटना बदल सुधारणा परिर्वतन इत्यादीची माहिती ती भावी पिढीसाठी महत्त्वाची असते. इतिहास म्हणजे गत काळातील प्रतिबिंबत आरसा असतो. त्याच्या आधारे भावी पिढी आपल्या जीवनाची वाटचाल करू शकतात. त्यासाठी इतिहास हा मार्गदर्शक ठरत असतो. इतिहासाचे

विविध पैलू वेगवेगळे भाग होऊ शकतात. उदा. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, भौगोलिक इत्यादी तेव्हा आपण जो विचार करतो आहे. तो आदिवासी बांधवाचा सामाजिक अस्थित्वंचा कारण त्याचे अस्थित्व या धरती मातेतून या मातीतून निर्माण झालेल्या निसर्ग सृष्टीचा आणि निसर्ग सृष्टीतून निर्माण झालेल्या आदिवासीमानवाचा तो इतिहास प्रकृतितून निर्माण झालेला आहे.

◆ ◆ ◆

# आदिवासी एकता मानवी मूल्याची खाण

आदिवासी एकता फक्त नाव नाही
मानवी मूल्यांची खाण आहे.
श्रम, समूह आणि सहकार्यावर आधारीत
मानवी जीवनाचे सुंदर स्वप्न आहे

आदिवासी एकता करताना स्वत:ला
चाचपून पहावे,
सागा - साय, माय-बाप यांना ही विचारावे
आल्या समाजाला आपणच जाणावे

आदिवासी एकता फक्त
सवलतीची मशाल नाही, संस्कृतीला जपावे,
माणसाला, माणुसकीने जोडावे
माणसा-माणसात - माणुसकीचे दर्शन घडावे

भिल-पावरा, कोकणा-धानका
महादेव कोळी, टोकरे कोळी
गोंड-प्रधान, वारली-कातकरी
जमाती-जमातीत भेद आहे
जखमेतील जखम आहे
समानते शिवाय एकता नाही
रोटी-बेटी व्यवहार त्यावर इलाज आहे.
त्यातच एकतेचे खरे दर्शन आहे.

रोटी-बेटीचा व्यवहाराचा अर्थ -
आपसात सोयरीक जमवणे
सोयी-सवलतीच्या पलिकडे जिव्हाळा जपणे
सुख-दु:खात एक होणे
प्रेम-विश्वासाचे जीवन जगणे

रोटी-बेटी व्यवहाराचा अर्थ शोधणे
उँच-नीच भेदभाव आणि
आपल्यातला अहंकार सोडण्यास
आपणच राजी होणे
माणसा-माणसातील भिंती तोडून
मोकळा स्वास घेणे

आदिवासी एकता फक्त पुरुषांची नाही
बायांनी ही पुढे यावे
आमच्या जीवनावर आमचाच अधिकार
आपला आवाज आपणच बुलंद करावे
मुक्तीचे गीत गावे
आदिवासी मुक्ती, स्त्री मुक्ती, मानव मुक्ती
उलगुलान ! उलगुलान !! उलगुलान !!!

वाहरु सोनवणे
ता. शहादा, जि. नंदुरबार

# आदिवासी समुदायासाठी समुदाय रेडिओची उपयुक्तता

श्री. विनायक दिनकर पाटील
(एम.फिल. संशोधक विद्यार्थी, समाजशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

## प्रास्ताविक

महाराष्ट्राची समाजरचना ही तीन भागामध्ये विभागलेली दिसून येते. या समाजरचनेचा एक भाग म्हणजे नागरी समाज, दुसरा ग्रामीण समाज व तिसरा भाग हा आदिवासी समाज होय. यांपैकी नागरी व ग्रामीण समाज हे आज मोठ्या प्रमाणात शिक्षित, सामाजिक-आर्थिक दृष्टीने प्रगतीच्या दिशेने वाटचाल करणारे, शासकीय-निमशासकीय कार्यालये, खाजगी कंपन्यांमध्ये नोकरी करणारे आणि विविध व्यवसायांमध्ये कार्यरत असलेले दिसून येतात. तसेच या समाजामध्ये सामाजिक-हक्कांची जाणीव निर्माण झाल्याने हे दोन्ही समाज संघटित होऊन स्वत:च्या विकासाच्या दृष्टीने महत्वपूर्ण गरजांची पूर्तता संप, मोर्चा उपोषणे इ. कायदेशीर मार्गाने शासनावर दबाव आणून करून घेत आहेत. वरील दोन्ही समाजांपासून स्वत:चे वेगळे अस्तित्व असणारा निसर्गाच्या सान्निध्यात राहणारा, स्वत:ची वेगळी संस्कृती, मूल्ये, विश्वास जपणारा, जंगलातील मध, कंदमुळे, जळाऊ लाकूड, औषधी वनस्पती आणि शेती व दुग्ध व्यवसाय यावर आपली उपजिविका चालवणारा तसेच विकासाच्या प्रवाहापासून अजूनही बऱ्याच अंतरावर असणारा समाज म्हणजे आदिवासी समाज होय.

शासन आदिवासी समाजासाठी विविध योजना आखत आहे. त्याची अंमलबजावणीही शासकीय यंत्रणेमार्फत केली जात आहे. मात्र तरीही ही शासकीय यंत्रणा आदिवासी समाजाशी सुसंवाद साधण्यास अजूनही पूर्णपणे यशस्वी झालेली नाही. वीज, शिक्षण, आरोग्य व इतर सुविधा काही प्रमाणात आदिवासींना मिळत असल्या तरी अजूनही विकासाच्या दृष्टीने आदिवासी समाज बराच पाठीमागे आहे. दळणवळणाच्या अपुऱ्या सोयी, निरक्षरता व सरकारी योजनांबद्दलचे अज्ञान, यामुळे आदिवासी बांधव सामाजिक-आर्थिक संधी व सवलतींचा लाभ मिळवू शकत नाहीत. गरीब आर्थिक स्थितीमुळे आदिवासी बांधव टी. व्ही., रेडिओ यांसारखी जनसंपर्काची माध्यमेही खरेदी करू शकत नाहीत. आजही बऱ्याच आदिवासी पाड्यात वर्तमान पत्रांचाही अभाव दिसून येतो. विशेष म्हणजे ही जनसंपर्काची माध्यमे आदिवासी प्रश्नांचा उहापोह करतात असे वाटत नाही. याचा परिणाम म्हणजे आजही आदिवासी समाज अनेक विकासाच्या योजनांपासून अनभिज्ञ आहे. सत्ता आणि संपत्ती यांची विपुलता असणाऱ्या आदिवासी समाजातील मूठभर पुढाऱ्यांनीच याचा लाभ उठवला आहे व खरा आदिवासी हा आजही योग्य नेतृत्वापासून दूर व विकासाच्या योजनांच्या प्रतिक्षेतच आहे.

अशा परिस्थितीत आदिवासी बांधवाच्या बोली भाषेत त्यांच्यापर्यंत पोहोचणारे, आदिवासींच्या स्थानिक व तळागाळातील प्रश्नांची उकल करणारे, आवश्यक माहिती व ज्ञान पुरविणारे, शासनाच्या योजनांची ओळख व आदिवासींच्या हक्कांची जाणीव करून देवून आदिवासींना विकासाच्या प्रक्रियेत सामावून घेणारे माध्यम म्हणून समुदाय रेडिओ हे माध्यम उपयुक्त ठरू शकेल.

**समुदाय रेडिओ म्हणजे काय ?**

समुदाय रेडिओ ही एक लहान संघटनाच असते. जी त्या समुदायातीलच लोकांनी समुदायासाठी चालवलेली असते. समुदाय रेडिओचे प्रसारण हे काही किलो मीटर पर्यंत भौगोलिक भूप्रदेशातील समुदायापुरते मर्यादीत असते. समुदाय रेडिओची व्याख्या तीन बाजूंनी केली जाते. ती म्हणजे अशा प्रकारचे रेडिओ स्टेशन हे वैयक्तिक फायदा मिळविण्याच्या हेतुने सुरु केलेले नसते तर समुदायाचा विकास हे प्रमुख ध्येय असते. या रेडिओवर त्या समुदायाचीच मालकी व नियंत्रण असते आणि समुदायाच्याच सहभागाने कार्यक्रम तयार होत असतात.

समुदाय रेडिओ म्हणजे समुदायाच्या मालकीचा, समुदायाकरिता असणारा आणि समुदायाकडून चालवला जाणारा रेडिओ होय. समुदाय रेडिओवरील कार्यक्रमांचे व्यवस्थापन आणि निर्मिती यामध्ये समुदायाचाच सहभाग असतो आणि हाच सहभाग समुदाय रेडिओचे व्यावसायिक, खाजगी जनसंपर्काच्या माध्यमांपासून वेगळेपण दर्शविते.

समुदाय रेडिओवरील कार्यक्रम हे समुदायाचा विकास आणि समुदायातील लोकांचे सबलीकरण विचारात घेऊन तयार केले जातात. समुदायातील लोकांना स्वत:ची ओळख, स्वत:च्या परिस्थितीची ओळख आणि स्वत:च्या हक्कांची जाणीव होते यामध्ये स्थानिक परिस्थिती आणि स्थानिक घडामोडींना प्राधान्य देऊन माहिती, करमणूक आणि स्थानिक विषयांशी संबंधित अधिकारी, तज्ञ यांच्या मुलाखती, चर्चा यांद्वारे समुदायातील लोकांमध्ये जनजागृती करण्याचे कार्य समुदाय रेडिओकडून होते, जेणेकरून समुदायाला सामा/आर्थिक विकासात सहभागी होण्याची संधी मिळते.

आज भारतात अनेक राज्यांमध्ये आदिवासी समुदाय रेडिओ प्रकल्प (स्टेशनस्) आदिवासी समुदायाच्या विकासात मोलाचे योगदान देत आहेत. केरळ राज्यामध्ये वायनाड जिल्ह्यातील मनथावड्य गावातील आदिवासींसाठीचा समुदाय रेडिओ, ओरिसा राज्यातील कोरपूट जिल्ह्यात कार्यरत समुदाय रेडिओ, गुजरात राज्यातील डांग जिल्ह्यातील दृष्टी समुदाय रेडिओ या समुदाय रेडिओं करवी आदिवासी समुदायांच्या सामाजिक - आर्थिक परिस्थितीत, राहणीमानात आमूलाग्र परिवर्तन घडून येत आहे. मध्यप्रदेश राज्यातील तर जवळ-जवळ आठ जिल्ह्यातील आदिवासी समुदायांत समुदाय रेडिओ स्टेशनस् कार्यरत आहेत.

राज्याच्या एकूण लोकसंख्येत बराच वाटा असलेल्या व राज्याच्या कानाकोपऱ्यात विखुरलेल्या, आपल्या राहणीमान, जीवनमान, संस्कृती, पोषाख, कला इ. मध्ये वैविध्य असलेल्या, शासकीय योजनांबाबत अनभिज्ञ असलेल्या, शेती याबद्दल बऱ्याच प्रमाणात अज्ञानी असलेल्या, स्वत:चे हक्क, अधिकार यांची अजूनही जाणीव नसलेल्या महाराष्ट्रातील आदिवासींसाठी समुदाय रेडिओसारखे प्रकल्प राबविणे गरजेचे आहे.

## आदिवासी समुदायासाठी समुदाय रेडिओची उपयुक्तता

जंगलचा राजा म्हणून ओळखला जाणारा आदिवासी हा निसर्गात राहणारा, स्वत:ची वेगळी संस्कृती, देवदेवता, भाषा, निश्चित भूप्रदेश, परंपरागत शेती व्यवसाय, दुग्ध उत्पादन, जंगलातून मिळणारे मध, डिंक व औषधी वनस्पतींची विक्री करून गुजारा करीत असतो. आदिवासी प्रदेश हे नैसर्गिक साधन संपत्तीने समृद्ध आहेत. त्यामुळे तेथे अनेक लहान-मोठे औद्योगिक प्रकल्प उभे राहात आहेत. मात्र अज्ञानामुळे व सरकारी योजनांची माहिती नसल्याने आदिवासींच्या शेतजमिनींचे हस्तांतर तसेच सावकार, व्यापारी यांच्याकडून होणारी पिळवणूक व शोषण ह्या नित्याच्याच बाबी झाल्या आहेत.

शासन आज आदिवासींना विकासाच्या प्रक्रियेत आणण्यासाठी विविध योजनांद्वारे प्रयत्न करीत आहे. मात्र आजही आदिवासींबरोबर शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांची नाळ जुळलेली दिसून येत नाही. कारण, आजही आदिवासी लाजरा-बुजरा व पांढरपेशा समाजापासून स्वत:ला वेगळे समजणारा आहे. अशा परिस्थितीत त्याच्या संस्कृतीचे जतन करून बदलत्या जगाशी त्यांचे समायोजन कसे साधता येईल याचा विचार होणे आवश्यक आहे. शासनाच्या योजना कोण-कोणत्या आहेत ? त्यांचा उद्देश काय ? त्यांचे फायदे काय आहेत ? त्यांची अंमलबजावणी कशी होते ? त्या मिळविण्यासाठी प्रक्रिया काय आहे ? या सर्व प्रश्नांची सखोल माहिती आदिवासींना नित्य-नियमाने मिळणे आवश्यक आहे. म्हणूनच समुदाय रेडिओ आदिवासींना वरदान ठरू शकतो तो म्हणजे पुढीलप्रमाणे.

- समुदाय रेडिओ हा कमी किंमतीत उपलब्ध होणारा, चालविण्यास एकदम सोपा आणि समुदायातील लोकांपर्यंत त्यांच्या बोलीभाषेत पोहचणारे स्थानिक व तळागाळातील प्रश्नांची उकल करणारे माध्यम आहे व कोणीही आदिवासी व्यक्ती थोड्याशा प्रशिक्षणाने समुदाय रेडिओ चालविण्याची जबाबदारी घेऊ शकतात.
- आदिवासी समुदायातील परंपरागत लोकगीते, लोककथा, दंतकथा, संगीत इ. स्थानिक लोकांकरवी म्हणवून घेऊन त्यांचे रेकॉर्डिंग करून पुन्हा त्याचे समुदाय रेडिओवरून प्रसारण करता येऊ शकते. यामुळे आदिवासींमधील लोप पावत चाललेली सांस्कृतिक कला नियमितपणे जोपासली जाऊन तिचे पुनरूज्जीवन करता येऊ शकते.
- आदिवासी लोकांचे स्वत:चे अनुभव तसेच त्यांच्या दैनंदिन जीवनावर प्रभाव टाकणाऱ्या घडामोडी, सरकारी योजना, नियम इ. चे चर्चा, मुलाखत यांद्वारे परीक्षण करण्याचे सामर्थ्य समुदाय रेडिओमुळे मिळू शकते. उदा. समुदाय रेडिओमार्फत न्युक्लियर बजेट योजनेची माहिती देता येईल. याबद्दल समुदाय रेडिओवरुन चर्चा घडवून आणून लोकांचा प्रतिसादही आजमावता येईल व त्याचे रेकॉर्डींग करून संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत लोकांचे मत पोहोचवता येईल व अधिकाऱ्यांना पुढील निर्णय घेण्यास सहाय्य होईल.
- आदिवासींच्या विकासासाठी असणाऱ्या महत्त्वपूर्ण योजनांच्या माहितीचे नियमित

प्रसारण केल्याने आदिवासींमध्ये या योजनांची जाणीव निर्माण होईल व यासाठी समुदाय रेडिओ ची भूमिका महत्त्वपूर्ण ठरू शकते. उदा. शासनाच्या योजना, आदिवासी विकास महामंडळ व आदिवासी विकास विभाग यांच्या योजना, आदिवासी सहकारी संस्थांच्या योजना, राष्ट्रीयीकृत बँका आणि भूविकास बँका यांच्यामार्फत चालवल्या जाणाऱ्या योजना, आदिवासींसाठी वनसवलती, दुग्धव्यवसाय व जमीन सुधारणेच्या योजना, जिल्हा औद्योगिक केंद्र व इतर विकास महामंडळाच्या योजना, जिल्हा औद्योगिक केंद्र व इतर विकास महामंडळाच्या योजना, जिल्हा परिषदांच्या योजना इ. संबंधी महत्त्वपूर्ण माहिती समुदाय रेडिओमार्फत आदिवासी बांधवांपर्यंत पोहोचू शकते.

- शासनाच्या वरील योजनांशी संबंधित अधिकाऱ्यांशी सुसंवाद साधण्याची संधी ही आदिवासींना समुदाय रेडिओमार्फत मिळू शकते उदा. प्रकल्प अधिकारी, संशोधन अधिकारी तसेच इतर संबंधित अधिकाऱ्यांना समुदाय रेडिओच्या कार्यक्रमांमधून आमंत्रित करून त्यांच्यातील चर्चा, मुलाखती यांद्वारे आदिवासी बांधवांना आवश्यक माहिती मिळेल. त्यांना त्यांच्या अडचणींची ओळख होईल व त्यावर उपायही सापडेल.
- शासकीय अधिकाऱ्यांबरोबरच लोकप्रतिनिधी, राजकीय पुढारी यांनाही समुदाय रेडिओवर आमंत्रित करून चर्चेच्या माध्यमांतून त्यांनी केलेल्या कामाचा आढावा घेता येईल. आदिवासी बांधवांचे प्रश्न, शंका, अडचणी त्यांच्यासमोर मांडता येतील. यामुळे आदिवासींमध्ये स्वतःच्या अधिकारांबद्धल जाणीव निर्माण होईल आणि लोकशाहीच्या प्रक्रियेतील त्यांचा सहभाग निश्चित वाढेल.

## सारांश आणि सूचना

थोडक्यात समुदाय रेडिओ हा आदिवासींपर्यंत त्यांच्या बोलीभाषेत पोहोचून त्यांच्या संस्कृतीचे जतन करणारे व त्यांच्या सर्वांगीण विकासात महत्त्वपूर्ण योगदान देणारे साधन ठरू शकते. यामुळे देशविकासातील आदिवासींचा सहभाग निश्चितच वाढेल.

१६ नोव्हेंबर २००६ रोजी भारत सरकारने समुदाय रेडिओसंबंधी नवीन धोरण जाहीर केले आहे. या धोरणानुसार स्थानिक समुदायांच्या विकासात सहभागी होणाऱ्या, ना नफा तत्त्वावर चालणाऱ्या एन.जी.ओ., सामाजिक संघटना तसेच, शैक्षणिक संस्था यांना काही अटींवर समुदायांच्या मदतीने समुदाय रेडिओसारखे प्रकल्प चालविण्याची परवानगी देण्यात आली आहे. युनेस्कोनेही अशा प्रकल्पांना निधी देवू केला आहे. अशा परिस्थितीत आदिवासींसाठी कार्य करणाऱ्या संस्था, संघटना यांनी आदिवासींसाठी समुदाय रेडिओसारखे प्रकल्प चालविण्यास पुढाकार घ्यावा तसेच समाजातील दानशूर व्यक्तींनीही अशा प्रकल्पांसाठी मदत करावी. यामुळे आदिवासी समाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्यास निश्चितच हातभार लागेल.

• • •

# क्रांतिकारी गोदावरी परूळेकरांची आदिवासी चळवळ : वास्तव, भवितव्य व मर्यादा

प्रा. डॉ. महेश मोटे
राज्यशास्त्र विभाग, उस्मानाबाद

**प्रस्तावना :**

क्रांतिकारी गोदावरी परूळेकरांनी महाराष्ट्रामध्ये उभारलेल्या आदिवासी चळवळीच्या ६६ वर्षानंतर आज त्यांच्या चळवळीची अवस्था काय आहे ? याचा विचार करायला हवा. त्यांचे निधन होऊन आज जवळपास ११ वर्ष पूर्ण झाली. मात्र त्यांची चळवळ आजही संपलेली नाही. आजही तेवढ्याच जोमाने व त्यांच्या प्रेरणेने ती चालूच असल्याचे दिसते.

खरेतर आपल्याकडे नेत्यांच्या निधनानंतर त्यांनी उभारलेल्या चळवळी संपून जातात किंवा दिशाहीन तरी होतात. अनेक नेत्यांनी, महामानवांनी उभारलेल्या चळवळींची दिशाहीन अवस्था होऊन त्या संपल्याचा इतिहास आहे. त्यात टिळक, आगरकर, रानडे व सावरकरांची प्रबोधनवादी चळवळ असो, कर्मवीर शिंदे, भाऊराव पाटील, शाहू महाराज यांची चळवळ, अब्राम्हणेतर चळवळ व आंबेडकरी चळवळ या नेत्यांच्या नावावर चालणाऱ्या पक्षीय चळवळीही भरकटत संपलेल्या किंवा वैचारिक केंद्र बदलून व्यावहारिक झालेल्या पाहायला मिळतात.

यातल्या जवळपास चळवळींची ही अवस्था होण्याचे मुख्य कारण त्या व्यक्ती नेतृत्व केंद्रीत होत्या व त्या तोलामोलाचे नेते त्या चळवळीतून उदयाला आले नाहीत. त्या नेत्यांचे व्यक्तिमत्त्वही इतके भव्यदिव्य होते की, नंतर ते नेते व त्या काळचे वास्तव दोन्ही अशक्य गोष्टी बनल्या. परंतु त्यांच्या विचारांचा, कर्तृत्वाचा वारसा चालविणाऱ्यांनी नावाच्या शिवाय चळवळीत पुढे काहीच स्वीकारलेले दिसत नाही.

बदललेल्या वास्तवाच्या संदर्भात बदलून घेतले नाही. चळवळीला विकासाच्या प्रक्रियेत वाहू न देता स्वतःच्या विकासासाठी राबविले. त्यामुळे त्या नेत्यावरचा व त्यांच्या व्यावहारिक राजकारण व समाजकारणाचा विश्वास उडाला. समाजाला आजही चळवळीची आवश्यकता आहे. चळवळीशिवाय समाज स्थितीशील बनतो, गोठतो. त्याला चळवळीची ऊर्जा आवश्यक असते. नेतृत्व केंद्रीत झालेल्या चळवळीपुढे सत्तेच्या व्यक्ती स्वार्थी राजकारणात अडकतात आणि समाजापासून नाते तोडून कालांतराने त्याही नष्ट होतात.

गोदावरी परूळेकरांच्या चळवळीचे मात्र वरील प्रकारचे स्वरुप दिसत नाही. ती संपलेली नाही. त्याची काही कारणे आपल्याला सांगता येतील. कोणतीही मार्क्सवादी चळवळ ही व्यक्ती

केंद्रीत नसून संघटन केंद्रीत असते. तिचे ध्येय व्यापक व परिपूर्ण असते. ती केवळ राजकीय व्यवहार सत्तेची समीकरणे यापुरती मर्यादित नसते. राजकीय जाणीव घडविल्याशिवाय राजकीय उन्ष्टिांचा विचार करीत नाही. राजकीय व्यवस्था सत्ता केंद्रित न राहता राष्ट्र व समाजकेंद्रीत असते. मतांचे राजकारण न करता कार्यक्रमावर केंद्रित राजकारण करते. त्यामुळे वेगाने सत्ता हस्तगत झाली नाही तरी भविष्य हे याच चळवळीचे असते आणि अधिक विश्वास बसतो. नवनवे कार्यकर्ते तयार करणारी अभ्यास वर्ग प्रणाली पक्षाने चळवळीत आणलेली असल्याने चळवळीत परिपक्वता, प्रामाणिकता, त्यागीवृत्तीचे कार्यकर्ते तयार होतात म्हणून गोदावरी परुळेकरांच्या चळवळीने हेच धोरण अवलंबिलेले दिसते.

गोदूताईचे नेतृत्व अधिक सक्षम होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील गुणांनी चळवळ अधिक गतिमान झालेली होती. त्यांच्यानंतर इतके गतिमान व त्यागी, सक्षम नेतृत्व नाही. म्हणून चळवळीची त्यांच्या स्वभावाची छाप असलेली गती थोडी धीमी झालेली आहे. परंतु त्यांच्या चळवळीने तिच्यात सातत्य व कार्यशीलता राहावी म्हणून दुसऱ्या फळीचे अनेक तेवढेच प्रामाणिक व झोकून देणारे कार्यकर्ते या चळवळीत तयार झालेले आहेत.

गोदूताईंची निष्ठा परिपूर्ण परिवर्तनाशी बांधलेली असल्याने त्यांना चळवळ आणि संघटन या दोन गोष्टी अधिक महत्त्वाच्या वाटतात. सामान्य आदिवासींच्या कोणत्याही अपेक्षा संघर्षाविना साध्य होणार नाहीत. त्याकरिता चळवळ आणि संघर्ष हेच मार्ग उरतात. ही गोदूताईच्या चळवळीकडे पाहण्याची भूमिका असल्यामुळे त्यांनी सतत चळवळ सक्रिय ठेवण्याकडे व संघटन मजबूत बनविण्याकडे अधिक लक्ष केंद्रीत केले. आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी या दोन विशेषांपासून स्वतःला कधीच अलग केले नाही.

त्यांच्या वयाची 85 वर्षे पूर्ण झाले असता त्यांचा नागरी सत्कार माजी आमदार लहानू कोम यांच्या हस्ते व पद्मनाभन् यांच्या अध्यक्षतेखाली झाला, तेव्हा आयुष्याच्या शेवटच्या क्षणीही त्यांनी चळवळ आणि संघटन याच गोष्टीला प्राधान्य दिले. त्या म्हणत, "आज मी आदिवासी समाजात ना. म. जोशी, शामराव परूळेकर यांनी जो मार्ग दाखविला त्या मार्गाने गेले, त्यामुळे मी यशस्वी झाले. त्याचबरोबर शोषित आदिवासी समाजाचे काम करताना माझा स्वार्थ मी बाजूला ठेवला. ठाणे जिल्ह्यामध्ये माझी सेवा क्रांतिकारक स्वरुपाची होती, तर आचार्य भिसे यांची सेवा घटनावादी होती. ज्या जनतेत काम करावयाचे त्या जनतेशी काम करणाऱ्याने एकरुप व्हायला पाहिजे. ह्या मंत्राप्रमाणे मी माझ्या जीवनाची वाटचाल केल्यामुळे मी जीवनात यशस्वी झाले."[1]

तर औरंगाबाद येथील 'भूमीहीन हक्क संरक्षण परिषदे' समोर प्रमुख पाहुण्या म्हणून भाषण करताना हेच ध्येय व्यक्त केले. भारतासारख्या पूर्णतः जीवन शेतीवर अवलंबून

असलेल्या समाजाला शेती असणे आवश्यक असते; परंतु इथे शेतीचे विभाजन मोठ्या विषम प्रमाणात झालेले आहे. आजही भूमीहीन शेतमजूर मोठ्या संख्येने आहेत. त्या म्हणत, "आजही भूमीहीनांचा प्रश्न सुटलेला नाही. शेतमजुरांना बारमाही मजूरी व मजुरीचे योग्य दर मिळत नाहीत. काँग्रेस सरकार सत्ता मिळवण्यावरच राजकीय शक्ती खर्च करते; परंतु सत्तेचा उपयोग करुन दलित, पीडीत, शोषित आदिवासींच्या जगण्याचा प्रश्न सोडवण्याला कधीच अग्रक्रम देत नाहीत. स्वातंत्र्याची गेली ४० वर्षे इथला दलित व आदिवासी समाज आजही भुका कंगालच आहे. त्यांची परिस्थिती २००० वर्षापूर्वीच्या आदिम समाजासारखीच आहे, त्यासाठी सशक्त संघटन व गतिमान चळवळीची गरज आहे." [2]

गोदूताईंच्या चळवळीचे संघटन आणि अत्यंत खालच्या स्तरातील समाजासाठी लढा हे चळवळीचे ध्येय मानल्यामुळे आणि सामाजिक परिवर्तन व राजकीय जाणीवेची जडण-घडण हे ध्येय मानल्यामुळे सोबतच स्वतःला झोकून देण्याची वृत्ती जोपासल्यामुळे त्यांच्या चळवळीत अनेक तरुण सामील झाले. त्यांच्या निधनानंतर त्यांनीच ही चळवळ आपल्या खांद्यावर घेऊन आजही महाराष्ट्रामध्ये कार्यरत ठेवलेली दिसते. अनेक तरुण गोदुताईच्या चळवळीमध्ये आजही सक्रियपणे काम करताना दिसतात.

प्रत्यक्ष आदिवासी समाजामधून नेतृत्व घडवण्यावर गोदूताईंनी भर दिला. प्रामुख्याने काळूराम धांगडा, भिकल्या धिंडा, जानभाऊ धाँगडा, प्रदीप प्रभू , मारोती पाटील, प्रल्हाद माळवदकर, वासुदेव जामसंडेकर, ब्रिजपालसिंह वाघेला, सावळा झिप्रु पवार, गोपाळ धाक्या हिलिम, सीताराम हिऱ्या वाघ, रामदास बेंडू वाघ, हरि राघू पवार, रामा जानू वाघ, चांगो गंगो टबाले, सोनू जानू पवार, तुळशीराम बाळू मुकणे, दत्तात्रय दामा दमाळे, पार्वती जानू वाघ, त्रिंबक जानू वाघ, नवसू सोनू भोये, दत्तू देऊ मुकणे, रामदास बेंडू पवार, तुकाराम गोपाळ दिवा, यशवंत शंकर वाघ, पदमन काळू गावीत, सखाराम बचा दिवे, लखमा रघू वाघ, गोपाळ रुपा पवार, शेवंती लाडक वाघ इत्यादी अनेक तरुण आदिवासी कार्यकर्ते महाराष्ट्राभर गोदूताईच्या चळवळीने घडविले व त्यांनी त्यांच्यानंतरही आदिवासी चळवळ तेवढीच सक्रिय ठेवलेली आहे.

वयाच्या शेवटपर्यंत त्यांनी पक्ष बांधणी व संघटन सातत्य यावर भर दिला. दि. 9/9/1987 रोजी किसान सभेच्या व पक्षाच्या सदस्य संख्येच्याविषयी एक निवेदन काढून त्यांनी चिंता व्यक्त केली होती. संघटनेच्या व पक्षाच्या लढ्यातील शक्ती कायम ठेवण्यावर या निवेदनातून त्यांनी भर दिला होता.

प्रा. सर्जेराव ढाकणे यांनी गोदूताईंच्या चळवळीची "दलित, मजूर, आदिवासी समाजाला आजही गरज असल्याने, शेतकऱ्याचे संघर्ष तेवत ठेवण्याची गरज असण्याची ही चळवळ सक्रिय असण्याची आवश्यकता व्यक्त केली. त्यांनी गोदूताईंच्या चळवळीला ऐतिहासिक मानून आज तिच्यात काळानुरुप बदल करुन नवे ऐतिहासिक

कार्य करायचे आहे."[3] ही भावना व्यक्त केली सुहास सामंत यांनी गोदूताईंच्या चळवळीचा ऐतिहासिक आलेख महत्त्वाचा मानून तिच्या भविष्याविषयी अत्यंत महत्त्वाचे उद्‌गार काढीत, आजही तिचे महत्त्व मान्य केले. ते म्हणतात, "त्यांच्या चळवळीचे अनेक पैलू आहेत. माणसे बदलतील पण चळवळ बदलत नाही. जी व्यवस्था पूर्वी आम्हाला विरोध करीत होती ती आज मदत करते. जे अशिक्षित अडाणी आदिवासी चळवळीत येत नव्हते ते आज चळवळीत भाग घेतात. त्यांच्यामुळे आदिवासी चळवळ मजबूत झाली. पक्षापेक्षाही गोदूताईंचे व्यक्तिमत्त्व महान होते, ते चळवळीशी एकरुप झाले होते. पक्ष म्हणजे गोदूताई व गोदूताई म्हणजे पक्ष, असेच समीकरण पक्षात तयार झाले होते. आजही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव व प्रेरणा यांनी चळवळ पुढे चालत आहे."[4] लहानू कोम यांनीही आपल्या मुलाखतीमधून गोदूताईंच्या प्रेरणा मानून आदिवासींचा लढा कायम ठेवण्यावर भर दिली.[5] शंकर भोईर यांनीही आपल्या मुलाखतीमध्ये गोदूताईंनी शहापूर भागामध्ये उभारलेल्या आदिवासी लढ्याचे स्वरुप सांगून महाराष्ट्रामध्ये सक्रियता समजावून सांगितली.[6]

गोदूताईंनी स्वतःही लढ्याविषयीचे व आदिवासीच्या चळवळीविषयीचे मत व्यक्त करताना, आदिवासी जीवनाच्या आजच्या स्वरुपाविषयीचे मत व्यक्त करताना म्हटले की, "आदिवासींनी मजुरी वाढीसाठी व त्यांचा आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी इतके लढे दिल्यानंतर आज आदिवासींची आर्थिक परिस्थिती सुधारली आहे, उपासमार टळली आहे, अशी जर समज झाली तर ती चुकीची होईल. आदिवासींच्या आर्थिक परिस्थितीत म्हणण्यासारखा काहीच फरक झालेला नाही. आजही वर्षातले चार महिने त्यांना अर्धपोटी जगावे लागते. कंदमुळे, झाडपाला खाऊन दिवस काढावे लागतात. काही वेळा उपासमारीमुळे अक्षरशः उपासच घडतो. या परिस्थितीचे मुख्य कारण हे की, त्यांचा मूलभूत प्रश्न जमिनीचा आहे."[7]

कोणत्याही सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचे अंतिम ध्येय नवसमाजरचनेचे हे असते. नवी राजकीय प्रणाली व नवी जीवन प्रणाली घडविणे हे अंतिम ध्येय असते. गोदूताईंची आदिवासी चळवळही सामाजिक परिवर्तन, न्याय, हक्क व मानवतावादी स्वातंत्र्याचा लढा असल्याने त्याचे ही नवी राजकीय प्रणाली व नवी जीवनप्रणाली निर्माण करुन एक नवा समाज निर्माण करणे हे त्यांचे अंतिम ध्येय होते. जे कृष्णा खोपकर यांनी अत्यंत योग्य शब्दात व्यक्त केलेले आहे की, "भांडवलदारी शोषणाच्या पंखाखाली त्यांचे जीवन फुलूच शकत नाही. म्हणूनच त्या भांडवलदारी सरंजामशाही शोषणातून कायमची मुक्ती साध्य करुन घेण्यासाठी, आदिवासी समाजाला भांडवलशाही, सरंजामशाही समाज व्यवस्था उखडून टाकण्यासाठी आणि समतेवर आधारलेला नवसमाज त्या जागी प्रस्थापित करण्यासाठी सर्वच श्रमिक जनतेच्या क्रांतिकारक लढ्याचा एक भाग मानून लढावे लागेल. त्या सर्वंकष अंतिम लढ्यात एक घटक म्हणून समाविष्ट झाल्यानेच आदिवासी समाजातील व

अन्य नागरी समाजातील मानसिक भिन्नतेचे अंतर कापले जाईल. एकच एक, खराखुरा भारताच्या समग्र जनजीवनाशी एकरुप झालेला नवीन आदिवासी आत्मविश्वासाने फुंललेला आणि स्वबळावर चढत जाणारा आदिवासी समाज राजकीय मंचावर अवतीर्ण होईल.

हा नवा आदिवासी समाज विज्ञाननिष्ठा आत्मसात करुन अंधश्रद्धेची जळमटे काढून टाकून पण आपल्या अभिजात संस्कृतीची सकारात्मक वैशिष्ट्ये जतन करत इतःवर अलग समाज म्हणून नव्हे तर भारतीय लोकशाहीचा इतर सर्वाइतकाच अधिकारी असलेला घटक म्हणून धीरोदात्तपणे पाऊल टाकेल. थोडक्यात यापुढे तो 'आदिवासी' न राहता भारतीय समाजवादी लोकशाही समाजाचा अविभाज्य घटक म्हणून नांदेल." [८] हेच ध्येय समोर ठेवून आजही महाराष्ट्रामध्ये ही आदिवासी चळवळ वाढत आणि विस्तारत आहे असे दिसते. आदिवासी समाजाच्या समस्या व संघर्ष संपलेला नसल्याने ही चळवळ आपल्या अंतिम ध्येयापर्यंत जाण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसते.

**गोदावरी परुळेकरांच्या चळवळीच्या काही मर्यादा :**

भारतीय समाजाच्या इतिहासामध्ये सामाजिक परिवर्तनाचे लढे भरपूर झाले. समाजात अनेक कारणांनी असंख्य वेळा स्थित्यंतरे झाली; मात्र भारतीय समाजाच्या आधुनिक अवस्थेच्या काळात भारतीय आदिवासी समाज अत्यंत हलाखीचे, मागासलेले, पशुपातळीवरचे; म्हणजे मध्ययुगीन अवस्थेतले जीवन जगत होता.

इतिहास काळापासून या समाजाच्या प्रगतीसाठी, जीवनस्तर उंचावण्यासाठी गुलामीतून मुक्तीसाठी कोणीच चळवळ केली नाही. इतिहासात त्यांच्यासाठी महाराष्ट्रामध्ये त्यांना संघटीत करुन त्यांच्यात परिवर्तनाची, मानवी स्वातंत्र्याची चळवळ परूळेकरांनी केली.

म्हणून त्यांच्या महाराष्ट्रातील चळवळीला सामाजिक परिवर्तनाच्या लढ्याच्या इतिहासात ऐतिहासिक मूल्य प्राप्त होते; परंतु या चळवळीच्या काही मर्यादाही आहेत; हे मान्य करावे लागते.

गोदूताईंच्या आदिवासी चळवळीला महाराष्ट्रामधल्या सगळ्या आदिवासी जमाती आपल्या लढ्यात सामील करुन घेता आलेल्या नाहीत. काही जमाती अति मागासलेल्या आहेत, दुर्गम भागात राहतात, ज्यांची उपजीविका शेतीवर अवलंबून नाही; किंवा ज्या जमाती स्थलांतरित जीवन जगतात, त्यांचे प्रश्न या चळवळीत हाताळलेले दिसत नाहीत.

शेती, शेतकरी, शेतमजूर किंवा कंत्राटदारांच्या कामावर राबणाऱ्या, सरकारी रोजगारावर अवलंबून असणाऱ्या वा अन्य ठिकाणी मजूरदार, घरगडी, सालदार म्हणून राबणाऱ्या म्हणजे शेतीनिष्ठ आदिवासींच्या, कामगार, मजूरदार आदिवासींच्या समस्यांना या चळवळीने मुख्यतः हाताळलेले आहे. वेगवेगळ्या मार्गांनी उपजीविका चालविणारे, अत्यंत दयनीय जीवन जगणारे, शासन व समाज यांचे अजिबात लक्ष वा संबंध नसलेले अनेक आदिवासी समुदाय

महाराष्ट्रभर विखुरलेले आहेत. ते या चळवळीच्या परिघात आलेले दिसत नाहीत. कम्युनिस्ट पक्षाच्या वा किसान सभेच्या कार्याचा प्रभाव असलेल्या भागातच ती चळवळ प्रभावीरीत्या कार्य करताना दिसते.

गोदूताईंच्या भूमीहीनाच्या लढ्याचा फायदीही परंपरेने शेती करीत आलेल्या आदिवासींनी घेतला. भूमीहीन जमातींना जमिनी मिळवून देऊन त्यांच्या जीवनाला स्थैर्य प्राप्त झालेले दिसत नाही.

त्यांची या चळवळीमागची मार्क्सवादी भूमिका एक राजकीय परिवर्तनाची चळवळ म्हणून या समाजात काही भागांमध्ये गेली खरी; परंतु समाजाच्या बदलाचे, नवसमाजरचनेचे नवे शास्त्र म्हणून या समाजात आजही रुजवायचे आहे.

आदिवासी चळवळ मुख्यतः आर्थिक शोषणाच्या प्रश्नावर केंद्रित राहिली. मार्क्सवादी भूमिकेला हे धरुनच आहे. वर्गीय तत्त्वज्ञानावर चळवळ उभारताना असे योग्यच आहे. मात्र भारतीय समाजवास्तवात आदिवासींच्या गुलामीला, शोषणाला, जाती व्यवस्था, वर्ग व्यवस्थाही अधिक जबाबदार आहे. त्यांच्या चळवळीत या भूमिकेवर संघर्ष झाल्याचे दिसत नाही.

त्यांची चळवळ आदिवासींच्या नवसमाजरचनेचा आर्थिक आकृतीबंध सविस्तर सादर करते. एक मानवी समाज म्हणून सामाजिक संरचनेच्या स्वरुपातील इतर अनेक सामाजिक पैलू चळवळीच्या वैचारिक मंथनात येताना दिसत नाहीत. राजकीय समीकरणे वा महाराष्ट्रातील पारंपारिक सत्तेच्या राजकारणावर परिणामकारक प्रभाव पाडून त्यात मूलभूत बदल जाणवण्याइतपत बदल केल्याचे दिसत नाही. मात्र या वरील नोंदविलेल्या मर्यादा या चळवळीत येण्याला अनेक घटक कारणीभूत आहेत. महाराष्ट्रातील सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, भौगोलिक घटकही तेवढेच जबाबदार आहेत. आदिवासी समाजाची सामाजिक संरचना व मुख्य समाजाची मानसिकताही जबाबदार आहे हे स्पष्ट दिसते.

**निष्कर्ष :**

- गोदावरी परूळेकरांच्या महाराष्ट्रातील आदिवासी चळवळीला ऐतिहासिक मूल्य प्राप्त झालेले आहे.
- सेवाभावी, कल्याणकारी, भूतदयावादी जंजाळातून म्हणजे एका आधुनिक शोषण पध्दतीतून आदिवासींना गोदूताईंच्या चळवळीनेच बाहेर काढले.
- त्यांच्या चळवळीने आदिवासीत राजकीय जाणीव, मानवी अस्मिता, स्वातंत्र्याची भावना जागविली. चळवळींचे, संघर्षाचे लक्ष जगण्याच्या प्रश्नावर, शोषणाच्या प्रश्नावर केंद्रीत केले हे व या वरील अनेक विशेष हे या चळवळीचे यश मानावे लागते.
- या चळवळीच्या प्रभावाने आदिवासींसाठी वेगळे कायदे करावे लागले. त्यात त्यांच्या

जमीनीविषयी, राजकीय अधिकाराविषयी, क्षेत्रीय संदर्भात मजुरीच्या दराविषयी, कर्जाविषयी, सामाजिक-सांस्कृतिक हक्काच्या सुरक्षेविषयी कायदे करावे लागले.

- या चळवळीच्या दबावानेच सरकारी पातळीवर त्यांच्या मूलभूत समस्या जाणून घेण्याचे प्रयत्न व्हायला लागले. त्यांचा जीवनस्तर उंचावण्यासाठी वेगळ्या उपाययोजना आखायला व त्यासाठी स्वतंत्र आर्थिक तरतुदीला आरंभ झालेला दिसतो.

- या चळवळीने आदिवासी समाजाला मुख्य समाजाशी, राजकीय, शैक्षणिक प्रक्रियेशी, स्वातंत्र्य-न्याय-हक्क इत्यादी मानवतावादी मूल्यांशी जोडलेले आहे. खऱ्या अर्थाने मानवी अस्मिता जागवून त्यांच्यातला माणूस जागा केलेला आहे. सोबतच या समाजाच्या परिवर्तनासाठी अजूनही खूप काही करावयाचे आहे. आजही हा समाज अनेक समस्यांच्या गर्तेतून बाहेर पडला नाही. अन्याय, शोषण, दारिद्र्य व कुपोषणाच्या चक्रातून मुक्त झालेला नाही. त्यांच्या सम्यक मुक्तीसाठी दीर्घ संघर्षाची गरज आहे; हे प्रांजळपणे कबूलही केलेले आहे.

- गोदूताईंनी ही चळवळ व्यक्तीकेंद्रीत न ठेवल्याने त्यांच्या निधनानंतरही त्याच गतीने, तेवढ्याच जोमाने ती सक्रिय आहे. ती चळवळ सक्रिय ठेवणारा कार्यकर्ता वर्गही त्यांच्या चळवळीने तयार केलेला आहे.

- गोदूताईंच्या आदिवासी चळवळीने आदिवासींच्या धर्मबदलाच्या, सेवाशुश्रूषेच्या, या कल्याणाच्या संकल्पामधली फसवेगिरी चव्हाट्यावर आणून क्रांती, बदल व परिवर्तनाची संकल्पना रुजविली. आदिवासींची दया, सेवा, उपकार, निर्भयशीलता संपवून हक्क, न्याय, स्वातंत्र्यासाठी संघटीत करुन आदिवासींना लढ्यात उतरविले. आदिवासींचा लढा मानवमुक्तीची चळवळ बनविली. हे त्यांच्या चळवळीचे महाराष्ट्रातील समाजपरिवर्तनाच्या चळवळीतील महान योगदान मानावे लागते. आपले हक्क, न्याय, स्वातंत्र्य मिळविण्यासाठी भारतीय मानवी इतिहासात आदिवासींना गोदूताईंनी प्रथमच संघर्ष शिकविला, संघटीत केले व चळवळ बनवली. हे त्यांच्या चळवळीचे मुख्य वैशिष्ट्य राहिले.

• • •

# आदिलाबादमधील आदिवासी भागामध्ये अतिसार एक मानवशास्त्रीय अवलोकन

प्रशांत कुलकर्णी, विरेंद्र परदेशी

## आदिलाबाद विभाग

आदिलाबाद जिल्हा म्हणजे आंध्र-प्रदेशातील एक विकसनशील जिल्हा, ज्याचा आदिवासींची संख्या खम्माम नंतर जास्त आढळून येते. आदिवासी भाग म्हटला की प्रकर्षाने जाणवते ती मोठ्या प्रमाणावर गरीबी, अशिक्षितपणा, कुपोषण, शुद्ध पिण्याच्या पाण्याचा अभाव हे आणि इतर बरंच काही, एकुणच ह्या भागात सुविधा पोहचत नाहीत. केंद्रीय आरोग्य कार्यक्रमांतर्गत देखील या भागामध्ये कमीच लक्ष केंद्रीत केलं जातं. भारत सरकारने मागास (आदिवासी-भूभाग) विभागासाठी खास सुविधा तरतूद केलेल्या आहेत. जसे ३०,००० लोक संख्येऐवजी २०,००० लोकसंख्येसाठी एक प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ५००० लोकसंख्येऐवजी ३००० लोकसंख्येसाठी एक उपकेंद्र, याशिवाय अधिक प्रमाणात फिरते दवाखाने, ॲलोपॅथी, आयुर्वेदिक, युनानी, सिद्धा यासारख्या आरोग्य सुविधांचा समावेश. इतर सगळं असूनदेखील आदिवासी लोकांचा फारसा आरोग्य यामध्ये फारसा सुधार झालेला आढळत नाही. आदिलाबाद मध्येही थोड्या-फार फरकाने हीच स्थिती आढळून येते.

या धर्तीवर आदिलाबादमध्ये एक सर्वसमावेशक ढाचा करण्याची योजना मास-सी.एच.आर.डी. नी अंमलात आणण्याचे ठरविले की जो ढाचा तेथील आरोग्य कार्यक्रमांचा व परिस्थितीचा आढावा घेईल व नियमित नवीन माहिती पुरवेल. या दृष्टीनेच पाऊल टाकताना एक वळणावर हा लेख आदिलाबाद मधील डायरियाची परिस्थिती यावर प्रकाश झोत टाकतो.

आदिलाबाद म्हणजे धनदाट झाडी, डोंगर-दऱ्यांनी नटलेला प्रदेश की, ज्याच्या सीमा एका बाजूने महाराष्ट्र राज्यातील नांदेड, चंद्रपूर आणि यवतमाळ यांच्या सीमेला लागून तर दुसरीकडे निजामाबाद, करीमनगर या जिल्ह्यांना लागून आहे. आंध्रप्रदेशमधील हा सर्वात मोठा जिल्हा आहे, ज्याचा साक्षरतेचा दर ५३% आहे व दारिद्र्य रेषेखाली जगणारी जनताही तेवढ्याच प्रमाणात आहे. जिल्ह्यामध्ये ४२% भूभाग जंगलाने व्यापला आहे व ७१% लोक हे शेती आणि त्यावर आधारित व्यवसायावर आपली उपजिविका करतात.

तर अशा ह्या आदिलाबादमध्ये १९९८ साली डायरियाचा (अतिसाराचा) प्रकोप झाला. आरोग्य समितीच्या अहवालानुसार. ३९८ लोकांचा यामध्ये बळी गेला व प्रसारमाध्यमांनी सांगितलेली संख्याही यापेक्षा किती तरी जास्त होती. याच धर्तीवर पुन्हा २००७ मध्ये मे महिन्यात हा डायरिया पुन्हा थैमान घालू लागला. आदिलाबादमधील आदिवासी प्रदेशामध्ये पुन्हा डायरियाने कहर केला. या

परिस्थितीमध्ये मास-सीएचआरडी चे दोन संशोधक प्रत्यक्ष उपस्थित होते. व त्यांच्या निरीक्षणातुन काही मुद्दे समोर आले. हे फक्त निरिक्षण नव्हतं तर शास्त्रीय विश्लेषण होतं. आणि ज्याला जोड होती ती त्यांनी त्या भागामध्ये जाऊन संवाद साधला. अशा लोकांच्या उत्तराची, वार्ताहराशी मुलाखत जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांशी वार्तालाप, आरोग्य कार्येकर्ते, ग्रामपंचायत सरपंच व सदस्य यांच्याशी भेट, प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य केंद्रातील डॉक्टरांशी वार्तालाप यांच्या संख्यात्मक विश्लेषण हा लेख संशोधकांनी जी परिस्थिति अनुभवली व समजून घेतली त्यावर आधारित आहे.

## सुरुवात कशी झाली ?

संशोधक ११ मेला आदिलाबादमधील एक आदिवासी बहुसंख्य असलेलं एक मंडळ (तालुका) उटनूर येथे दाखल झाले. त्यानंतर त्यांनी जिल्हास्तरीय आरोग्य अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्यास सुरुवात केली. त्यातून त्यांना समजलं की, अतिसारा (डायरिया) ने आपलं बस्तान बसवलं आहे व त्यामुळे आधिकाऱ्यांच्या नाकी नऊ आले होते. याला अजून एक कारण होतं ते म्हणजे प्रसारमाध्यमांनी या विषयाला दिलेली प्रसिद्धी. येथील स्थानिक वृत्तपत्र ईनाडू व वार्ता या वृत्तपत्रांनी डायरियाच्या केसेसची दखल घेण्यात सुरुवात केली. पण आरोग्य अधिकाऱ्यांनी याची फारशी दखल घेतली नाही व स्थिती नियंत्रणाखाली असल्याचे भासवले. पण रुग्णांची संख्या वाढू लागल्यानंतर त्यांच्या पायाखालची जमीन सरकली व नंतर पावले उचलली गेली. या सगळ्यामध्ये आरोग्य कार्येकर्ते, ग्रामपंचायत सदस्य इत्यादींनी पुरविलेल्या माहितीमुळे यातील काही गोटातील गोष्टी संशोधकांना समजल्या आणि त्याने खरी परिस्थिति समजण्यास मदत झाली.

## प्रसार माध्यमांची भूमिका

आधुनिक काळात प्रसारमाध्यमांना अनन्यसाधारण महत्त्व आहे की, जे तळागाळात जाऊन माहिती काढतात व त्यांना जगासमोर उघड करतात. आदिलाबादमध्ये जेंव्हा डायरियाच्या केसेस वाढत होत्या तेंव्हा प्रसारमाद्यमांनी महत्त्वाची भुमिका बजावली. प्रत्येक दिवशी केसेस वाढतच होत्या. मग प्रसारमाध्यमांनी/वृत्तपत्रांनी तो मुद्दा उचलुन धरला व विशेष मथळ्याखाली या बातम्या देण्यास सुरुवात केली. जवळपास सलग १ महिना या बातम्या प्रसिध्द होत होत्या आणि त्यामध्ये जे विषय चर्चिले गेले ते म्हणजे वैद्यकीय सुविधांचा अभाव, प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये डॉक्टरांची व इतर आरोग्य कर्मचाऱ्यांची अनुपस्थिती, पिण्याच्या पाण्यामध्ये क्लोरिन घालण्याचे आवश्यक प्रमाण ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना माहीत नसणं किंवा त्याबाबतीत ते जागरुक नसणं इत्यादी ह्या सगळ्याचा परिणाम भोगावा लागला तो म्हणजे गरीब आदिवासी लोकांना, ज्यांची ह्या सगळ्यामध्ये तसुभरही चूक नव्हती.

अजून एक महत्त्वाचा घटक आहे ती म्हणजे सरकारी आरोग्य अधिकारी, स्थानिक राजकारणी लोक इत्यादी जिल्हास्तरीय सरकारी आरोग्य अधिकाऱ्यांनी सुरुवातीला हे मुख्याघाताचे बळी म्हणून कानावर हात ठेवले. ज्यावेळेस या अधिकाऱ्यांशी बोलणं व्हायचं त्यांचे नेहमीचं वाक्य असायचं, ''काही नाटी हो, लोकं स्वत:च्या तब्येतीची

काळजी करत नाहीत. त्यांच्याकडे पोष्टिक अन्न असुनही खात नाहीत. परिसर स्वच्छ ठेवत नाहीत, वैयक्तिक स्वच्छता नसते. भर उन्हाचं शेतात काम करायला जातात आणि आजारी पडतात'' याच वाक्यांवर ते कायम होते. पण हळूहळू परिस्थितीने रंग बदलला तसा यांनी सुद्धा आपली वाक्य बदलली.

**नेमकं काय घडलं आदिलाबादमध्ये ?**

डायरियाची पहिली बातमी प्रकाशित झाली ती ईनाडूमध्ये ''... या भागातील सर्वलोक आजारी'' या मथळ्याखाली ती बातमी प्रसिद्ध झाली. यामध्ये पिण्याच्या पाण्यामध्ये क्लोरिन मिसळण्याची पद्धती व ग्रामपंचायत सदस्यांची ऊदासिनता यावर ताशेरे ओढण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्रात सुविधा नसल्याचेही यामध्ये प्रकर्षाने जाणवलं. ज्या भागात आदिवासी लोक राहतात. त्या काही भागामध्ये लोकांना खाजगी आरोग्य सुविधा उपलब्धच नव्हत्या. तेथे सरकारी आरोग्य सुविधांवरच अवलंबुन राहावं लागायचं. नंतर आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडल्या. आरोग्य कर्मचाऱ्यांनी ही जबाबदारी ग्रामपंचायतीची सांगुन अंग झटकले तर ग्रामपंचायतीने आरोग्य कर्मचाऱ्यांचे काम व्यवस्थित नसल्यामुळे ही परिस्थिती आली असा कांगावा केला. गेल्या वर्षी येथील काही लोकांनी चिकुनगुन्याचा अनुभव घेतल्यामुळे सुरुवातीला हा आजार चिकुनगुन्या तर नव्हे असा संशय व्यक्त केला गेला.

थोड्या कालावधीनंतर प्रसारमाधमांनी आरोग्य अधिकाऱ्यांशी संपर्क लाधुन त्यातुन उपाययोजना व जन-जागणावर भर दिला. त्यानंतर सरकारने देखील याची दखल घेतली व कार्यपत्रिका प्रकाशित केली. पण याचा फारसा परिणाम परिस्थितीवर झालाच नाही दुषित पाणी हा अजुन एक जबाबदार घटक म्हणुन समोर आला. पाण्यामध्ये क्लोरिन मिसळण्याचा प्रश्न तर होतोय.

पण ज्याभागामध्ये पिण्यासाठी पाणीच मिळत नव्हते. तिथे क्लोरिन काय मिसळणार ? लोक पाणी मिळण्यासाठी मैल न मैल चालत जात होते. विहीरीतील पाण्याची पातळी खाली गेलेली, बोअरिंगना पाणी नव्हते. पिण्यासाठी दाही दिशा अशी लोकांची परिस्थिती झाली होती. या संदर्भात जेंव्हा गावातील सरपंचाशी बोलले गेले त्या विळेस त्यांच्याकडुनदेखील सकारामक उत्तर मिळत नव्हते. उन्हामुळे, तापमानात वाढ झाल्यामुळे हे सर्व घडत असेल असे जुजखी उत्तर त्यांच्याकडुन मिळत होते. गावातील विहीरीमध्ये क्लोरिन मिसळण्यांची जबाबदारी ग्रामपंचायत सचिवाची असते. पण त्यांच्याकडूनही कामामध्ये दिरंगाई झाली.

या सगळ्याचा व्हायचा तो परिणाम झालाय वृत्तपत्रातुन डायरियामुळे मृत्यू ओढवला अशा बातम्या छापून येऊ लागल्या. मग खऱ्या अर्थाने सरकारी यंत्रणेला जाग आली व चक्र जोरात फिरू लागली व आरोग्य अधिकारी पीडीत गावांना भेटी देऊ लागले. निरीक्षणातून असंही दिसलं की, ज्या प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर्स, नर्सेस उपलब्ध होते ती सगळी पेशंटनी तुडुंब भरलेली होती. पेशंटना ॲडमीट करून घ्यायला जागा नव्हती. अक्षरशः वऱ्हांड्यात त्यांना भरती करुन घ्यायचे अपुऱ्या कर्मचाऱ्यामुळे उपलब्ध कर्मचाऱ्यांमध्ये कामाचा बोजा वाढला होता. ॲडमीट पेशंटना सांभाळुन त्यांना बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी)

ही सांभाळावी लागत होती. ह्या सगळ्यामध्ये नर्सेसची खूप तारंबळ उडायची कधी कधी सलाईन संपलेली असायची पण नर्सेसना ती काढायला वेळ नसायचा. याऊलट जिथे डॉक्टर नर्सेसची भरती नव्हती; जिथे जागा रिक्त होत्या. त्या प्राथमिक आरोग्य केंद्रात शुकशुकाट होता. तिथेही वृत्तपत्रांनी दखल दिल्यानंतरच त्या जागा भरण्यात आल्या. ह्या सगळ्याचा उहापोह चालु असताना काही स्थानिक कार्यकर्त्यांनी आरोग्य शिबिर भरवण्याची मागणी केली. ज्या ठिकाणाहून लोकांच्या मरणाची (मृत्युची) बातमी येत होती. त्या ठिकाणी मोठ्या अधिकाऱ्यांनी भेटी देणं सुरु केलं. लोकांनी वैद्यकीय सुविधांच्या बाबतीत असमाधान व्यक्त केले. तेव्हा सरकारी यंत्रणेने आरोग्य शिबिर घेण्यास सुरुवात केली.

याचबरोबर वृत्तपत्रांत या आजाराची लक्षणं व घ्यावयाची काळजी यावर माहिति छापून आणण्यास सुरुवात केली. पण बरेच लोक ते वाचु शकत नव्हते त्यामुळे त्यांच्यापर्यंत हे पोहोचत नव्हते. या अभ्यासातून असही पाहण्यात आलं की, गावपातळीवर काम करणाऱ्या आरोग्य सेवकाचंही तेवढच महत्व आहे. पण ते फक्त औषध पुरविण्यापुरतं मर्यादित होतं आणि त्यांच्याजवळ औषधही मुबलक प्रमाणात नसल्यांमुळे लोक त्यांच्यावर नाराज होते. ज्यावेळेस अधिकारी गावांना भेटी द्यायचे तेव्हा लोकांची तक्रार असायची. मग अधिकारी लोक या गावपातळीवरील कार्यकर्त्यांना आदेश द्यायचे तेही कोणताही पाठपुरावा न करता.

सरकारी आरोग्य समितीकडून नंतर स्थिती आटोक्यात आणण्यासाठी बरेच प्रयत्न झाले. त्यांनी कार्याचे अहवाल बनविण्यास सुरुवात केली आणि बराच उहापोह त्यावर केला गेला. योजना कागदावर आल्या आणि तिथंपर्यंतच मर्यादित राहिल्या. जर प्राथमिक आरोग्य केंद्रातील डायरियाच्या पेशंटच्या संख्येच्या आकडेवारीवर नजर टाकली तर अधिकाऱ्यांनी केलेले दावे खोटे ठरले असेच नजरेस पडले. जवळपास १३,५०० प्राथमिक आरोग्य केंद्रात साडेसहा हजार (वर्षाला) व आरोग्य शिबिरातून जवळपास आठ हजार पेशंटनी इलाज करवून घेतला. यावरुन असेच दिसते की, ही डायरियाची यादी बरीच मोठी होती.

सरकारी यंत्रणेची स्थिती नियंत्रणाखाली यावी म्हणून बरेच प्रयत्न केले, पण ते त्यांच्यासाठी स्वप्नय राहिले. ज्या प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर उपलब्ध नव्हते तिथे डॉक्टरांची नेमणूक केली गेली. जिथे आरोग्य कर्मचारी चांगलं काम करत नव्हते त्यांना तशी लेखी समज देण्यात आली. या अभ्यासातून असंही पाहण्यात आले की, प्राथमिक आरोग्य केंद्रात स्वच्छता नसायची, कापसाचे बोळे, कागदाची कपटं इत्यादी जमिनीवर पसरलेलं असायचं. याचबरोबर स्वच्छतागृहांची देखभाल नीट नव्हती. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नव्हती व कॉटची संख्याही मर्यादित होती. पण या सारख्या प्रश्नांकडे लक्ष द्यायला वेळ कुणाकडे होता ?

परिस्थितीचं गांभीर्य ओळखून राजकीय नेत्यांनी देखील भेटी देण्यास सुरुवात केली आणि विरोधी पार्टीकडून नाराजीचा सूर येणार नाही याची काळजी घेतली. त्यांनी अधिकाऱ्यांवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. ज्योळेस या अधिकाऱ्यांच्या

(पृष्ठ ४७ वर पहा)

# मराठी आदिवासी कवितेतील स्त्री

सौ. उल्का समरेंद्र निंबाळकर

**प्रस्तावना**

आदिवासी साहित्यिकांनी मराठी भाषेतून साहित्यनिर्मिती केली असल्याने मराठी वाङ्मयामध्ये आदिवासी साहित्यिकांची मराठी भाषेतील साहित्यनिर्मिती दाखल झालेली आहे. आदिवासी साहित्यिकांनी कविता हा साहित्यप्रकार मोठ्या प्रमाणावर वापरलेला आहे. या कवितांमध्ये विविध आशय आहे. या लेखामध्ये कवितांमध्ये स्त्रीविषयी काय मांडलेले आहे हे शोधून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

आदिवासी कवितांमध्ये आदिवासी स्त्रीची उदरनिर्वाहासाठीची धावपळ, अन्नवस्त्र या मूलभूत गोष्टींसाठीचे कष्ट, तिचे मनोरंजन, तिच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन, तिच्यावर होणारे अन्याय व अत्याचार, तिचे बाळंतपण व गर्भारपणाचे अनुभव, प्रस्थापित समाजातील स्त्री व आदिवासी स्त्री यांची तुलना, देवदासी, नाचणारी बाई यांचे जीवनदर्शन सावित्रीबाई फुले, राणी दुर्गावती, इंदिरा गांधी यांचा कर्तृत्वगौरव, स्त्रीभ्रूणहत्या, स्त्रीपुरुषसमानता, स्त्रीचे अस्मिता जागरण व परिवर्तन याविषयी कविता येतात.

**आदिवासी स्त्री व मुलभूत गरजा**

आदिवासी स्त्रीला कुटुंबासाठी, उदरनिर्वाहासाठी, जगण्यासाठी अपार कष्ट करावे लागतात. दिवसभर जंगलात फिरून लाकडे, बिया, मोहाची फुले त्या गोळा करतात. बाजारात बिया, मोहाची फुले, डिंक इ. विकून मीठ, तेल, मसाला विकत घेतात. प्रा. वामन शेडमाके 'ये माय' मध्ये लिहितात.

*''ये माय,*
*मी तुला जंगल जिव्हाऱ्यातील*
*एक एक काडी*
*जमा करताना पाहिले*
*भर उन्हात, जंगलाच्या वाटेने*
*वाट तुडवित तुडवित*
*मोळी आणताना मी पाहिले*
*रस्त्याने येताना भर उन्हात पाय*
*भाजतानाही पाहिले*
*घामाचे अश्रू पितांनाही पाहिले.''*

एवढे श्रम करुन, घामाचे अश्रू पिऊनही घरामध्ये सर्वांना पुरेल एवढे अन्न नसते. नेसण्यासाठी पुरेसे कपडे नसतात. कष्टाला पुरेसा मोबदला मिळत नाही. याविषयी 'तेंदू पत्ता' या कवितेत कवी वसंत कनाके लिहितात

*''माझी आई*
*आण जवान बहीण*
*रखरखत्या उन्हात*
*स्वत:ला जाळीत*
*एक एक तेंदूपत्ता जमा करते*
*तेव्हा ठेकेदाराचे लांडगे*

*मात्र बेभाव गिळून टाकते''*

व्यापारी लोक अगदी कमी किंमतीत या वस्तू विकत घेतात किंवा वजनात फसवतात किंवा 'भाराला भार - कापसाला गूळ, ज्वारीला डिंक, डिंकाला तांदूळ' (उलगुलान, भुजंग मेश्राम) अशी देवाणघेवाण करतात. शिक्षण नसल्यामुळे आपल्या श्रमाचे मूल्य बरोबर होते की नाही याची तिला जाणीव नाही. अजूनही अज्ञानामुळे तिच्या श्रमाला कवडीमोल किंमत येते. कवी माधव सरकुंडे 'स्वातंत्र्य' कवितेत म्हणतात की ''भामरागडातल्या अर्धनग्न माडिया बाया बघितल्या की स्वातंत्र्य म्हणजे अश्लील चेष्टाच वाटते.'' किंवा कवयित्री सौ. कुसुम अलाम लिहितात की

*''वस्त्र म्हणावे तर लंगोटी*
*स्त्रियांसाठी ना अंगभर साडी*
*छातीस चिकटती पोरे, नागडी*
*बघे तयाला म्हणती संस्कृती''*

अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजाही तिच्या पूर्ण नाहीत. त्या पूर्ण करण्यासाठी ती श्रम करते पण त्यातून तिला मोबदला न मिळाल्याने त्या अपूर्णच राहतात. स्वत:च्या गरजा पूर्ण करण्यासाठी तिला इतर मार्गही नाहीत. त्यामुळे दारिद्र्याच्या त्याचत्याच चक्रामध्ये ती अडकलेली आहे.

### आदिवासी स्त्रीवरील अत्याचार

मुलभूत गरजा पूर्ण होत नाहीत. पोटात भूक असताना, अंगावर गाठीचे लुगडे असताना तिला समाजातील पुरुषांच्या नजरांना सामोरे जावे लागते. त्यांच्या वासनांची आदिवासी स्त्री शिकार होते. आदिवासी स्त्री म्हणजे सहज उपलब्ध होणारी एक वस्तूच वाटते आणि वासनापूर्तीसाठी तिला वापरले जाते. याविषयीचे उल्लेख कवितेत येतात. जसे कवी माधव सरकुंडे याविषयी लिहितात-

''आश्लिलतेची गोष्ट निघाली म्हणून सांगतो तुमचा एक साहेब आमच्या राहोट्यात हमेशा येतो. इळभर मारीयाच्या पुत्रासमान हरेकाची वास्त पुस्त करतो, रात्री एखादी माडीयाची तरुणी रेस्टहाऊसवर घेऊन जातो''

किंवा कवी भुजंग मेश्राम '२९ जून ८०' या कवितेत मारेगाव (यवतमाळ) येथे भररस्त्यावर रात्री बलात्कार करुन बयना या कोलाम जमातीच्या आदिवासी तरुणीस मारुन निर्वस्त्र फेकले, याविषयी लिहितात. ही तरुणी रात्री एसटीची वाट बघत उभी होती किंवा रोजगार हमी योजनेत काम करणाऱ्या स्त्रीवरील अत्याचाराचे वर्णन कवी वाहरू सोनवणे करतात. याच विषयीची चीड व्यक्त करताना कवी कृष्णकुमार चांदेकर 'लायकी' कवितेत लिहितात.

''एक कर्मचारी मित्र म्हणाला मेळघाटात बायका घेऊन जाण्याची गरज नाही, सर्व काही तिथेच मिळतेय !''

इतके आदिवासी स्त्रीविषयी प्रस्थापितांचे दृष्टिकोन हीन आहेत. आदिवासी स्त्रीला उपभोग घेण्याची वस्तू म्हणून पाहिले जात असल्याचे उल्लेख कवितांमधून येतात.

### आदिवासी स्त्रीचे मातृत्वाचे अनुभव

ज्याप्रमाणे आदिवासी स्त्रीवरील अन्याय, अत्याचाराचे चित्रण कवितेतून येते त्याचप्रमाणे त्यांच्या 'स्त्री' म्हणूनच्या गर्भारपण, बाळंतपण,

बालसंगोपन याविषयीही उल्लेख कवितेत येतात. कवयित्री उषाकिरण आत्राम 'मातृत्व' या कवितेत रानातील प्रसूतीचे वर्णन करतात. तर कवी माधव सरकुंडे 'ठणक' कवितेत लिहून जातात ''अन् बाया जनतात झुडपामागं माकडीवाणी ?'' कवि वाहरू सोनवणे 'बाळंतीण बाई' मध्ये बाळंतीण बाईला खाण्यासाठी काहीच नाही पण तरीही बाळासाठी कामाला जावे लागते याचे चित्रण केलेले आहे. बाळाला दूध पाजावे लागते आणि त्यामुळे ही आई जे मिळेल ते खाते.

*''मिट्ट अंधारात - वाइत्या पाण्यातून*
*काढून आणलेली कडुकंद चघळताना*
*मोहाची फुलं खुडायची - नायतर*
*चिंचा आवळीचा पाला चघळून*
*तूला उरावर भरवायची*
*मांड्यावर रक्ताचा चिखल घेवून*
*आग्या मोहाळाची अळ्यांनी भरलेली पुरी*
*मी पोट आगीने चावायची*
*पिंपळ बाराची फुलं गोळा करताना ...''*

अशापद्धतीने ही स्त्री स्वत:चे पोट भरते.

''आणि तेच रेलॉ गीत आताही ओठावर घेऊन आपल्याच धुंदीत न्हात आहे !''

आदिवासी युवतीचे आनंदाचे तिचे तिचे मार्ग आहेत म्हणूनच ती गोटुलमध्ये जाऊन तिच्या प्रियकरासोबत भावी आयुष्याचे स्वप्न रंगविते.

'गोटुलाच्या स्वप्नात' या कवितेत कवी सुनील कुमरे लिहितात -

*''फुलमत ! आठव तुझे बालपण आणि*
*तारुण्याची रात्र*
*दिवसभर सणसणलेली अग्नीपाठ*
*भुकेने व्याकूळ मन आणि पोट*
*डोळ्यातील न संपणारी तहान*
*तरीही तू सजत होतीस ... गोटुलाच्या*
*स्वप्नात*
*तेव्हा येथील मातीचा सुगंध यायचा तुझ्या*
*शृंगारासाठी*
*आपल्या चेलीकांसाठी आभाळलेली गिकी*
*अन्*
*गुंफलेल्या डगरपोलाने बहरलेली मने*
*फुलायची आकाशीच्या चंद्र छायेत*
*आदिवासी संस्कृतीची विविध नृत्ये*
*उधळायचे रंग हलालाच्या प्रकाशात*
*तेव्हा तुला शुद्धही नसायची''*

भान हरपून जाणारी ही तरुणी जगण्याचा आनंद घेते. आपल्या दु:खामध्येच अडकून पडत नाही. दु:खाचा स्वीकार करुन ती प्रियकरासोबत भविष्याची स्वप्ने रंगविते.

जीवन फुलून येण्यासाठी काय लागते हे या फुलमत माहीत आहे.

**आदिवासी स्त्री आणि परिवर्तन**

आदिवासी स्त्रीला बदलायला पाहिजे, तिने परिवर्तनासाठी सज्ज झाले पाहिजे, असा विचारही कवितांमधून मांडलेला आहे. कवयित्री उषाकिरण आत्राम आदिवासी स्त्रीमध्ये परिवर्तन व्हावे म्हणून राणी दुर्गावती शूर रावण, एकलव्य, बिरसा मुंडा, बाबुराव शेडमाके, तंट्याभिल्ल, नारायणसिंह उईके

यांच्या प्रेरणादायी गोष्टींपासून प्रेरणा घेऊन संघर्ष करायला सांगतात. त्यांना आदिवासी स्त्रीमध्ये परिवर्तन बघायचे आहे त्याचे त्या वर्णन करतात -

*''आज ती अंगभर लुगडं गोवून आली*
*तिच्या हातात राणी दुर्गेचे चित्र होते*
*तिच्या रानातल्या सख्या पेटत्या मशाली*
*उगारलेले तीर धनुष्य घेवून वर्तुळात उभ्या होत्या..*
*त्या गर्जल्या गर्भार आभाळगत ...*
*आमचा प्रकाश आम्हीच होवू !''*

अशा परिवर्तनाने आदिवासी स्त्री जागृत होईल. 'म्होरकी' या कवितेमध्ये त्या सांगतात -

*''ही घ्या पेटती मशाल*
*मी निघाले - पाठीमागून तुम्ही या !''*

सूर्याचे वाण पदरात देऊन, सावधानतेचा इशारासुद्धा देऊन, जोखड फेकून ही कवयित्री म्होरकी (पुढारी) बनते आणि तिच्या सरख्यानांही बोलविते. कवायित्री सौ. कुसुम आलामदेखील 'पोरी जरा जपून' या कवितेत सांगतात -

*''दबकत दबकत आता*
*पुढे टाकू नको तू पाय*
*निर्भय होऊन लढण्या*

सांगते तुझी गे माय'' तर 'अबलेस' कवितेत त्या सांगतात -

*''नुसत्या ठिणगीने आग पेटते*
*हे तू जाणले पाहिजेस*
*स्वाभिमानाच्या वणव्यातच*
*आपली अस्मिता तेजाळली पाहिजेस''*

हा अस्मितेचा शोध स्वत:च घ्यावा लागणार आहे, हे कवयित्री सांगतात.

**इतर स्त्रिया**

हा अस्मितेचा शोध घेताना आदिवासी स्त्रीसाठी सावित्रीबाई फुले, राणी दुर्गावती ह्यांचा आदर्श समोर आहे. त्यांच्याविषयीही कविता आहेत. कथयित्री सौ. कुसुम अलाम 'क्रांतीमा सावित्रीस' या कवितेत सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा गौरव करतात. याशिवाय देवदासी, नाचणारी बाई, वांझोटी बाई, वेश्या यांच्याविषयीच्या भावनाही व्यक्त केलेल्या आहेत. माणूस म्हणून त्यांच्या वेदना, दु:ख समजून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. जसे की - कवी माधव सरकुंडे 'खण' कवितेत वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रियांविषयी लिहितात-

*'कुणी तरी म्हणाला :*
*'त्यांचं नशिब म्हणजे*
*त्यांनीच चितारलेले दुर्भाग्य'*
*मी म्हणालो*
*'नाही ! त्यांचं नशिब म्हणजे*
*आमच्या अनैतिकतेनी शापिलेले सौभाग्य'*
*कारण त्यांनाही असतात*
*कुलीन बायांसारखे*
*नाक डोळे हात पाय रडणारे मन*
*अन् स्त्रीत्वाने ओथंबलेला हृदयाचा खण !'*

तर बाबाराव मडावी 'हे प्रिये' कवितेमध्ये नाचणारीन स्त्रीची व्यथा नमूद करतात की, 'तू नाचत असशील भाकरीच्या तुकड्यासाठी' कवी वाहरु सोनवणे 'देवदासी' कवितेत देवदासींच्या जीवनाविषयी लिहितात.

*''एक मुलुख*
*तिथं देवाच्या नावावर मुली सोडतात*
*कोंबड्याबकऱ्यागत*
*तरुण होता होता*
*बगलेत घ्यावे*
*कानाकोपऱ्यात जाऊन*
*वापरून घ्यावे, कोण पाहतो*
*घर नाही, दार नाही*
*देवाच्या बकऱ्या त्या*
*देवदासी म्हणतात त्यांना''*

समाजाने ज्यांच्याकडे हीन नजरेने पाहिलेले आहे. त्यांच्या जीवनाचा वेध कवींनी घेतलेला आहे.

**तुलना**

आदिवासी स्त्री व प्रस्थापित समाजातील स्त्री यांची तुलना केलेली दिसते. जसे की -

''जोशी बाईंची मांडी दिसली तर ती अब्रू ठरते आणि मडावी बाईची मांडी दिसली तर ती संस्कृती ठरते, असे का ?'' (पृ. २१, पसुसा) किंवा ''अरे, एवढ्याशा टी. व्हीत इतके मोठी माणसं नाचतात कसे ? याचीच तारीफ करणारी माझी माय त्यांच्या इन्कमटॅक्स भरणाऱ्या मम्मीची बरोबरी करणार नाही.'' (पृ. २६ पतुसा)

किंवा

''अजूनही माझी माय घरात नागवी राहून लेकीला बाहेर पाठविते किंवा लेकीला नागवी ठेवून माय घराबाहेर निघते आणि त्यांच्या दिवसातून दहा साड्या फेरणाऱ्या मायलेकी एकाचवेळी सिनेमात जाऊन बसतात तरी भडवे म्हणतात यांना आरक्षणाची गरज काय'' (पृ. २७ पतुसा) आदिवासी स्त्रीची अन्न-वस्त्र-निवारा याबाबतची दुरावस्था, अज्ञान, दारिद्रय याविषयी प्रस्थापित समाजातील स्त्रीशी तुलना केलेली आहे.

**स्त्रीजातीचे प्रश्न**

ज्याप्रमाणे ही तुलना आहे, त्याचप्रमाणे एकूणच स्त्रीजातीविषयीच्याही कविता आहेत. स्त्रीभ्रूणहत्या या प्रश्नाविषयी कवी प्रकाश सलामे लिहितात तर कवी चामुलाल राठवा 'बालिकावर्ष' कवितेत व्यथा चितारीत करताना लिहितात.

*''ती पहा, ती पहा ओठावरचा हर्ष मावळलेली वर्षा उष्टावलेल्या पत्रावळीतून एक एक कण टिपणारी काही केलंस का तिच्यासाठी ? आणि ती पहा दुर्मुखलेली हर्षा, वर्षानुवर्षे, कमरेला कळकटलेल्या चिंध्या गुंफून करीत आहे लज्जारक्षण''*

बालिकांचे प्रश्न मांडलेले आहेत. तसेच स्त्री पुरुषसमानते-विषयी विचार आलेले आहेत. स्त्रीजन्मविषयी काय वाटतं याविषयी सौ. कुसुम अलाम 'मार्ग' (पृ. ५६ रानआसवांचे तळे) मध्ये लिहितात की प्रारब्धाचे भोग म्हणून स्त्रीजन्म अशी धारणा होती पण इतिहासात पाहिले आणि राणी दुर्गावतीचा पराक्रम पाहून वस्तःच्या या धारणेने जगण्याची किळस वाटली आणि शतकानुशतके स्वतःला अंधारकोठडीत ठेवले होते, त्या अंधारातून पुढे जाण्यासाठीचा मार्ग काढावासा वाटला. स्त्रीजन्म आहे म्हणून लाचार जिणं कवयित्री नाकारतात. आज समाजात स्त्रीची काय अवस्था आहे, तिचे जगणे कसे आहे, हे सौ. कुसुम अलाम 'स्त्री आणि मेघ' या

कवितेत सांगतात की -

*''तिला गरजताही येणार नाही*
*मनासारखे बरसताही येणार नाही*
*कारण त्याग, चारित्र्य, प्रतिष्ठा*
*यांनी तिच्या मुस्कटात जोरात हाणली*
*आहे''*

तरी स्त्रीविषयी आदरभाव व्यक्त करताना कवी गोपाळ गवारी 'स्त्री' कवितेत लिहितात - (पृ. ३ वाळवण)

*''जपण्या कुंकवाचे लेणे ती प्रभूचरणी लीन व्हायची, आणून डोळ्यांत प्राण ती दुःखातही हसायची कारुण्य, दया, माया जपणारी अशी ती कोण होती. अहो ती असणार कोण ? जगाची माता ती एक स्त्री होती''*

तर कवी गोपाळ गवारी 'सून' या कवितेत सुनेला सासुरवास करु नये म्हणून सांगतात. कवी वाहरु सोनवणे 'स्त्री' या विषयावर लिहितात की, तरुणपणी किजबीण, म्हातारपणी चेटकीण म्हणतात आणि तिच्या जीवनाची व्यथा मांडताना लिहितात -

*''एक वस्तू अशी*
*तिला वाटेत, घाटेत*
*सापडेल तिथं रोखावं*
*मनात आलं तर मिठीत घ्यावं*
*हौस फिटली तर सोडून द्यावं*
*हाक नाही, बोंब नाही''*

*''नवी साडी, नवी सून*
*सासऱ्याच्या पाया पडते*
*जुनी होऊन फाटते*
*साडीच्या संगेसंगे*
*आणि मग -*
*ठिगळे लावून लावून जगणे*
*जिंदगीभर !''*

स्त्रीचे जीवन म्हणजे फाटत जाणाऱ्या साडीसारखे, तरीही ठिगळ लावून ती जगत राहाते.

'आई' विषयी - स्त्रीच्या विविध भूमिका आहेत. आई ही भूमिका तिची सर्वश्रेष्ठ आहे. आईशी संवाद करणाऱ्या अनेक कविता आहेत. कवी वाहरू सोनवणे 'आई पहिली लढाई आपलीच' कवितेत माणुसकीची लढाई लढावीच लागेल. त्यामुळे आईने घाबरु नये असे सांगतात. पोलिस मारुन टाकतील म्हणून आई घाबरते. पण कवी आईला समजावतो की, मृत्यूच्या धाकाने किती दिवस लपणार ? आपले मनोगत कवी आईला सांगताना लिहितात.

*''आई, ही दुनिया चांगली नाही*
*तुझ्या डोळ्यातही पाणी*
*माझ्या डोळ्यातही पाणी*
*तुझा जीव दुखतो*
*माझा जीव दुखतो*
*आई, तुझा जीव घरात ओढतो आणि*
*माझा जीव बाहेर ओढतो*
*आई, पहिली लढाई आपलीच.''*

कविला आईची माया समजते, म्हणूनच त्याचे व्दंव्द होते. कवी प्रब्रम्हानंद मडावी 'माय' (पृ. २५९ शतकातील आदिवासी कविता) या कवितेत आईच्या जीवनाची व्यथा, प्रश्न मांडतात. तिने केलेल्या कष्टाविषयी सांगतात आणि आयुष्याचे प्रश्न

सोडविण्यासाठी संघर्षाचा रस्ता सुचवतात. कवी सुनील कुमरे 'विदीर्ण माय' (पृ. १३ तिरकामठा) मध्ये प्रश्न उपस्थित करतात की, घाट्यासाठी सरणारवर जळणारे तुझे तृप्त आयुष्य कधीच का पेटत नाही ? ज्याप्रमाणे कवी आपले व्दंव्द प्रश्न आईला सांगतात. त्याचप्रमाणे तिच्याविषयीचा जिव्हाळा, प्रेम, आदरही व्यक्त करतात. जसे की -

*''माय माय करिता*
*अशी माया किती*
*माझी माय लंकापती*
*अशी माया सोळबारा*
*माझी माय घाले पंख्याने वारा*
*मायेची माया*
*कोण करेल मावशी*
*मायेविना भिकारी*
*गरीब असो या करोडपती''*

**प्रेयसी :** आईविषयी जशा कविता आहेत. तशाच प्रेयसीविषयी कविता आहे. प्रेमाची भावना व्यक्त करताना प्रेयसीविषयी कविता आहेत. 'तिच्या' आठवणीत रमून त्या गोड आठवणी कवितेत अवतरलेल्या आहेत. कवी प्रभू राजगडकर 'आठवण एक' मध्ये अशीच एक आठवण सांगतात -

''टिटवाळयाच्या गणपतीकडे जाणे, कल्याणच्या स्टेशनवर तुझे ते पाठीवर थाप मारणे. आम्ही केलेली भाजी / भैय्याची जिलेबी / नदीचे पाणी गणपती पाठच्या भिंतीवर तुझा न चिपकलेला पैसा अन् तुझे आर्थोडॉकस निराश होणे, 'आपलं काही खरं असं अवघडल्यासारखं बोलण, हा प्रवास आज का आठवावा बरं !'

तुझ्या माझ्या नात्याचा मोहोर झुलतोय म्हणून ! तर कवी वाल्मिक शेडमाके त्याच्या प्रियेला त्याची इच्छा सांगतो की, तिच्या ओठांनी दु:खितांची गाणी, अन्यायाच्या कथा सांगण्यात, त्यातून करुणेचे तुषार यावेत. त्या ओठातून अथांग प्रेम, अमृताच्या सरी याव्यात. (पृ. ३५ जातीमुळे झालेला प्रेमभंग व त्याचे दु:ख कवी वसंत कनाके 'प्रेम' (पृ. ४५) कवितेत मांडतात. असेच न उमगलेल्या प्रेमाचा शोध कवी सुनील कुमरे तिरकमठा मध्ये घेतात. तिच्याविषयी ते लिहितात.

'भर दिवसा ती फार वचकून मला दूर सारायची सूर्य मावळतीला निघाला की ती खेटून बिलगायची तिची प्रत्येक वस्तू वाकायची पण तुटायची नाही आपली प्रत्येक वस्तू तुटायची पण वाकायची नाही.'

प्रेमाविषयी कविवित प्रेयसीची भूमिका घेऊन स्त्री येते.

अशा प्रकारे आदिवासी कवींनी स्त्रीच्या 'आई', 'प्रेयसी', 'बायको', 'सून' या भूमिकांविषयी कविता लिहिलेल्या आहेत. स्त्रीजन्माविषयी, तिच्या जीवनातील संघर्षाविषयी, दु:खाविषयी तिच्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाविषयी कविता लिहिलेल्या आहेत. तसेच आदिवासी स्त्री, तिचे जीवन, तिचे प्रश्न, तिच्यावरील अत्याचार, तिने याविरुद्ध संघर्ष करावा म्हणून उपदेश याविषयी कविता आहेत.

**समारोप**

या कवितांमधून स्त्री जी येते, ती समाजातील उपेक्षित घटक म्हणून किंवा तिच्याकडे आदराने पहा, तिला पुरुषांसारखीच समानता द्या या भूमिकेतून येते.

आई व प्रेयसी ह्या भूमिकेतील स्त्रियांशी संवाद आहे. त्यांच्या आठवणी आहेत. परंतु त्यांच्या 'अत्मसन्मानाच्या टोकदार जाणिवा' व्यक्त होताना दिसत नाहीत. (अपवाद सौ. उषाकिरण आत्राम व सौ. कुसुम अलाम) स्त्री माणूस आहे. तिला तिचे स्वतंत्र भावविश्व आहे. तिच्या प्रश्नाकडे बघण्याच्या पध्दती निराळ्या आहेत. तिचेही या सभोवतालच्या परिस्थितीवर भाष्य आहे. तिला स्वतंत्र विचार आहेत. याचे दर्शन घडविणाऱ्या स्त्रिया कवितेतून बघायला मिळाव्यात अशी आशा ठेवावी वाटते. कारण कवी गणेश परतेकी यांच्या 'अस्तित्व' कवितेतील स्त्रिया म्हणतात.

*''राम राज्यात देखिल काही राम नव्हते*
*आणि तुमच्या बोलण्यात तर मुळीच नाही*
*जगात कुठे राम राहिला नसताना*
*पुरुषाने सितेची आशा का धरावी''*

स्त्री असे प्रश्न विचारते कारण ती आता स्वतः आर्थिक दृष्ट्या सक्षम होऊ पाहते. आजूबाजूचे निरीक्षण ती करते. म्हणून आदिवासी कवितेनेही स्त्रीमधील हा होत असलेला बदल टिपावा असे वाटते. आदिवासी कवितेमध्ये संवेद्नशीलता, टोकदार जाणिवा, प्राथमिकपणा, जीवनमूल्यांवर निष्ठा, खरेपणा, वास्तवदर्शीपणा हे गुण आहेत. त्यामुळे स्त्रीविश्वाचा पाडोळा अनेकविध दृष्टिकोनातून घेणे या कवितेला शक्य आहे. त्यामुळे या कवितेकडून वैविध्यपूर्ण स्त्रीविषयी कविता येतील अशी आशा ठेवावी वाटते.

• • •

(पृष्ठ ३९ वरुन पुढे)

भेटी घेतल्या गेल्या त्यावेळेस त्यांच्या चेहऱ्यावर हा दबाव स्पष्ट जाणवायचा.

जेव्हा प्रत्यक्ष लोकांच्या भेटी घेऊन त्यांच्याशी बोलल्यावर समजलं की, थोड्याफार फरकाने दरवर्षी ते हीच परिस्थिती अनुभवतात. या आजारांविषयी असलेल्या माहितीची कमतरता, शिक्षणाची कमतरता, गरिबी या सर्व कारणांमुळे लोकांना अशा आजारांना बळी पडावे लागत होते.

या सगळ्यातून एक गोष्ट जाणवली ती म्हणजे यात प्रत्येक घटकाची भूमिका महत्त्वपूर्ण होती. पण प्रत्येकजण आपली भूमिका पार पाडण्यास असमर्थ ठरला. वृत्तपत्राचं यात वाखाणण्यासारखं कार्य होतं पण गाजावाजा करण्यापलिकडं ते फारस भरीव काम करु शकले नाहीत. तीच गोष्ट नेत्याची आणि अधिकाऱ्यांची जर भराभर पावले उचलली गेली असती तर कदाचित ही परिस्थिती ओढवली नसती.

या सगळ्या कठीण परिस्थीत हिरपळून निघालेल्या लोकांना आरोग्य शिबिरातून तात्पुरती मदत मिळाली. पण त्यातून भविष्यात अशी आपत्ती कोसळणार नाही याची शाश्वती नव्हती, आणि ते लोक पुन्हा एका नवीन आजाराला/आपत्तीला सामोरे जाण्यास तयार होत होते. ही स्थिती टाळता येण्यासारखी होती; पण सर्वच बाजुनी प्रकट झालेली असमर्थता व आपली कमकुवत सरकारी आरोग्य यंत्रणा ह्याकडून ती पेलवली गेली नाही. पुन्हा हे आदिवासी लोक चांगली व भक्कम आरोग्य सुविधा मिळण्यापासून वंचित राहिले.

• • •

## वर्गणीबाबत नम्र सूचना

हाकारा नियतकालिक गेली ३० वर्षे अव्याहतपणे चालू आहे, ते केवळ वर्गणीदार व हितचिंतकांमुळेच. आदिवासी, दलित व इतर उपेक्षित समाजाचे व्यासपीठ असणारे हाकारा विषयाच्या मर्यादेमुळे अधूनमधून अनियमित कालावधीत प्रकाशित होते. त्यामुळे वरील समाजाचे विषय हाताळणाऱ्या लेखक-कार्यकर्त्यांच्या लेखनाचे स्वागतच आहे. परंतु त्याचबरोबर वर्गणीदार व्यक्ती व संस्थांना देखील नम्र विनंती आहे की, आपली वार्षिक वर्गणीची मुदत संपलेली असेल तर कृपया तपासून पाहावे व वेळेत वर्गणीची रक्कम पाठवावी, तरच अंक वेळेत काढता येईल. धन्यवाद.

**• वर्गणीचा तपशील •**

**वार्षिक वर्गणीदार (व्यक्ती) - रु. १००/-    वार्षिक वर्गणीदार (संस्था) - रु. १५०/-**

**आजीव सभासद - रु. १०००/-**

आपले विनम्र,

**संपादक मंडळ**

**हाकारा त्रैमासिक**

**६४. आनंद पार्क, औंध, पुणे --४११ ००७.**

## -: लेखकांसाठी :-

*हाकारा हे आदिवासी प्रश्नांना वाहिलेले एकमेव मराठी नियतकालिक आहे. यातून आदिवासी जीवन, संस्कृती, साहित्य, सण, उत्सव, कला तसेच आदिवासी कार्यकर्ते व आदिवासींमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे अनुभव, काही सेवाभावी व्यक्तींची व्यक्तीचित्रणे याशिवाय आदिवासींसंबंधीच्या कथा, कविता इत्यादी सर्वप्रकारच्या लेखनांस प्रसिध्दी दिली जाईल. आपण आपले साहित्य नियमित पाठवीत जावे.*

**- संपादक**

१९८० - १. जबरन जोत जंगल जमीन
२. आदिवासी व शिक्षण
३. आदिवासी वनसंवर्धन
४. आदिवासी साहित्य व कला
१९८१ - १. दलितांना सवलती व राखीव जागा
२. आदिवासी व आरोग्य
३. वनशेती व संवर्धन
४. रोजगार हमी योजना
१९८२ - १. धरणे व विकास
२. धरणे व विकास
३-४. जंगल व्यवस्थापन
१९८३ - १. आदिवासी व दारु
२. आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी
३. प्रा. सरदार गौरव अंक
४. आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न
१९८४ - १-२ आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य
३. आदिवासी स्त्री
४. आदिवासी आरोग्य व शिक्षण
१९८५ - १. आदिवासी संघटन
२. जमीन हस्तांतर
३. आदिवासी महिला
४. आदिवासी व सरकार
१९८६ - १. जंगल व धरण
२. आदिवासी कला
३. आदिवासी व वेठबिगारी
४. आदिवासी विषयक ग्रंथ : मानवशास्त्र परिचय
१९८७ - १. भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न
२. आदिवासी आणि सांस्कृतिक बदल
३-४. राष्ट्रीय वननितीचा प्रश्न
१९८८ - १. सवलती अपहरणाची समस्या
२. आदिवासी साहित्य
३.-४. आदिवासी समाज व संस्कृती
१९८९ - १-२. डॉ. वेरिअर एल्विन विशेषांक
३-४. व्यवसाय मार्गदर्शन
१९९० - १-२. १महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती
३. जागतिक अदिवासी
४. गं. बा. सरदार स्मृति विशेषांक
१९९१ - १. आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक
२. आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्या
३. आदिवासी जीवन व संस्कृती
१९९२ - १-२. आदिवासी समाज जीवन
३-४. अनुताई वाघ विशेषांक
१९९३ - १-२. आदिवासी धर्म, सण व उत्सव
३-४. धरण - विस्थापन व पुनर्वसन
१९९४ - १. आदिवासी संस्कृती
२. आदिवासी एकता परिषद
३. आदिवासी विकासाची सैध्दांतिक भुमिका
४. आदिवासी जमाती
१९९५ - १-२. राणीपूर अभ्यास विशेषांक
३. कुपोषण विशेषांक
४. पर्यावरण विशेषांक
१९९६ - १. आदिवासी जमाती
२. महाराष्ट्र, ओरिसा अदिवासी अध्ययन
३. आदिवासी जमाती
४. आदिवासी शिक्षण
१९९७ - १-२. वारली लोकगिते व बोलीभाषा
३. पंचायत राज विशेषांक
४. साहित्य संमेलन विशेषांक
१९९८ - १. वृक्ष लागवड व संवर्धन विशेषांक
२. आदिवासी व प्रशासन
३-४. आदिवासी समाज व संस्कृती
१९९९ - १. आदिवासी व आर्थिक धोरण
२. आदिवासी विकास व संस्कृती
३-४. बोर्डी परिसर अभ्यास
२००० - १. आदिवासी जीवन, कला व मराठी साहित्य
२. स्त्रिया आणि आरोग्य
३. पाणी टंचाई आणि पाणलोट विकास
४. आदिवासी जीवन व संस्कृती
२००१ - १-२. अस्मिता व विकास विशेषांक
३. आदिवासी समाज व शासन
४. अस्मिता व विकास : दिशा २००१
२००२ - १. अदिवासी व उपेक्षित समाज : अस्मिता आणि विकास
२-३. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प : महाराष्ट्र
४. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प : पर्यायी उपाययोजना
२००३ - १-२. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प : मध्यप्रदेश
३. आदिवासी समाज
४. आदिवासी संस्कृती
२००४ - १. पुस्तक परिचय
३-४. आदिवासी विकास धोरण
२००५ - १. प्रस्तावित वनकायदा
२. डॉ. बानू कोयाजी स्मृती विशेषांक
३-४. आरोग्य व शिक्षण - नंदूरबार अभ्यास विशेषांक
२००६ - १-२. डॉ. इरावती कर्वे स्मृति विशेषांक
३-४. आदिवासी अस्मिता व साहित्य कला
२००७ - १-२ संस्कृती व समाज - आदिवासी पायाभूत सर्वेक्षण विशेषांक
३-४ आरोग्य - आदिवासी पायाभूत सर्वेक्षण विशेषांक

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

## (द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अॅन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस - मास)

मानव विज्ञान या संज्ञेमध्ये मानव, समाज, संस्कृती व पर्यावरणाशी असलेले नाते याविषयी सर्वांगीण दृष्टीने अभ्यास करणाऱ्या सर्व विद्याशाखांचा अंतर्भाव होतो. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेची स्थापना १९७६ साली पुणे विद्यापीठात झाली. शासन, सामाजिक कार्यकर्तेव संशोधक यांना एका व्यासपीठावर आणून आदिवासी ग्रामीण तसेच शहरी समाजातील लोकांच्या समस्या समजावून त्या सोडविण्यासाठी ज्ञान व अनुभवाचा उपयोग करणे हे परिषदेचे मुख्य ध्येय आहे. महाराष्ट्र राज्याचे पहिले आदिवासी सचिव - आयुक्त श्री. वसंत मंडलेकर हे संस्थेचे पहिले अध्यक्ष होते. त्यानंतर प्रा. गं. बा. सरदार, श्री जनार्दन वळवी, प्रा. पां. अ. सुखात्मे, प्रा. अ. रा. कुलकर्णी यांनी अध्यक्षपद भूषविले. आदिवासी भागात काम करणारे कार्यकर्तेतसेच आदिवासी साहित्यिक यांना महाराष्ट्रात प्रथमच परिषदेचे एका व्यासपिठावर आणले.

केवळ आदिवासींच्या प्रश्नांना वाहिलेले हाकारा त्रैमासिक गेली २५ वर्षेपरिषदेतर्फे प्रकाशित होत आहे. लोकांच्या समस्या त्यांच्या नजरेतून समजून, त्यांचा सहभागातून एकात्मिक विकास साधण्याची परिषदेची वैचारिक बैठक आहे. आर्थिक विकास व समता हे परिषदेचे ब्रीद आहे. आदिवासी उत्थान कार्यक्रमाद्वारे आदिवासी समाजाच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आदिवासी लोकांचे सबलीकरण करणे व त्या प्रक्रियेतून त्यांचा आत्मविश्वास, आत्मसन्मान व अस्मिता जागृत करणे हा परिषदेचा दृष्टिकोन आहे. त्याद्वारे बहुविध राष्ट्रीय सांस्कृतिक प्रवाहास आदिवासी संस्कृतिच्या योगदानाच्या निरंतर संधी प्राप्त होतील.

यापुढील काळामध्ये आर्थिक परिवर्तनाद्वारे सामाजिक क्षेत्रांचा विकास घडवून आणणाऱ्या सरकारी व स्वयंसेवी संस्थाच्या सहकार्याने वाटचाल करण्याचा परिषदेचा मानस आहे. परिषदेची कार्यकक्षा अधिक विस्तृत व्हावी या हेतूने दोन केंद्रांची स्थापना केली आहे.

१. स्वास्थ व विकास संशोधन केंद्र २. आदिवासी व ग्रामीण विकास केंद्र

### महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

हाकारा वार्षिक सभासद १०० रुपये (व्यक्तींसाठी)
हाकारा वार्षिक सभासद १५० रुपये (संस्थासाठी)
परिषद आजीव सभासद १००० रुपये (व्यक्तींसाठी)

परिषदेच्या आजीव सभासदांना हाकारा विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक / आजीव वर्गणी कृपया खालील पत्त्यावर महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद (द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अॅन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड डाफ्ट अथवा मनिऑर्डर पाठवावी. मनिऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता**

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, ६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७.
आपल्या क्रियाशील सहकार्याबद्दल धन्यवाद